दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ६ वे अंक –२६८ रविवार दि.०७ जुन २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-268 Sunday, Dt.07 June 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# मान्सूनचा ४ राज्यांमध्ये प्रवेश

नवी दिल्ली/भोपाळ/जयपूर/लखनौ : केरळमध्ये ३ दिवसांच्या विलंबाने दाखल झाल्यानंतर मान्सूनने वेग पकडला आहे. केरळ, कर्नाटक, तामिळनाडूच्या संपूर्ण किनारपट्टी भागातून पुढे सरकत मान्सून योग्य वेळी गोव्यात पोहोचला. येथे मान्सून दाखल होण्याची सामान्य तारीख ५ जून होती.

मान्सून मुंबईत वेळेवर किंवा त्यापूर्वी दाखल होऊ शकतो अशी अपेक्षा आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत मान्सून ईशान्येकडील राज्यांसह पश्चिम बंगालच्या काही भागांपर्यंत पोहोचू शकतो. १० दिवसांच्या आत बिहार, झारखंड आणि ओडिशाच्या काही भागांमध्ये मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. तथापि, नंतर मान्सून अडकू शकतो. स्कायमेट वेदरचे हवामान तज्ज्ञ जीपी शर्मा यांनी सांगितले की पूर्व आणि मध्य भारतात मान्सून पुढे नेण्यासाठी बंगालच्या उपसागरात एका मजबूत हवामान प्रणालीची आवश्यकता असते ज्याचे संकेत सध्या नाहीत. अशा परिस्थितीत मध्य प्रदेश, छत्तीसगड व्यतिरिक्त, बिहार, झारखंड, ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या उर्वरित भागांमध्ये मान्सूनचा वेग मंदावू शकतो.

सध्या, गुजरात वगळता इतर सर्व राज्यांमध्ये मान्सूनपूर्व पाऊस पडत आहे. राजस्थानमध्ये शुक्रवारी धूळ आणि वादळी वा–यासह झालेल्या जोरदार पावसामुळे चार लोकांचा मृत्यू झाला.

मान्सूनवर तज्ज्ञांचे मत

मान्सून केरळच्या किना–यापासून सुमारे ३५ किमी दूर समुद्रात १२ दिवस अडकून राहिला होता. तरीही, हवामान विभागाच्या मते, ४ जून रोजी केरळमध्ये पोहोचणे सामान्य मानले जाईल, जरी ते सरासरी तारखेपेक्षा ३ दिवस उशिरा आले असले तरी.

हवामान विभागाच्या मते, ५ जूनपर्यंत देशात मान्सूनचा पाऊस सामान्यपेक्षा १४% कमी नोंदवला गेला. तरीही, गेल्या ४ दिवसांत परिस्थितीत वेगाने सुधारणा झाली आहे. पावसाची कमतरता ४०% वरून १४% पर्यंत कमी झाली आहे.पुढील २–३ दिवसांत मान्सून ईशान्येकडील राज्यांसह पश्चिम बंगालच्या काही भागांपर्यंत पोहोचू शकतो. तर, १० दिवसांच्या आत बिहार, झारखंड आणि ओडिशाच्या काही भागांमध्ये मान्सून पोहोचण्याची शक्यता आहे.



## परभणी जिल्ह्याला पुन्हा वादळी वाऱ्याचा तडाखा

परभणी जिल्ह्यात शनिवारी सायंकाळी अचानक आलेल्या सोसाट्याच्या वादळी वाऱ्याने मोठी दाणादाण उडाली. अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याने वाहतुकीवर परिणाम झाला असून काही मार्ग तात्पुरते बंद करण्यात आले आहेत. पूर्णा तालुक्यातील पूर्णा झिरो फाटा मार्गावर मोठी झाडे रस्त्यावर कोसळल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली.

यामुळे वाहनचालकांना काही काळ मोठा मनस्ताप सहन करावा लागला. प्रशासनाकडून झाडे हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले. दरम्यान, माटेगाव ते लक्ष्मणनगर पाटी या मार्गावर चक्रीवादळासारखे तीव्र वादळवारे वाहिल्याने अनेक झाडे उन्मळून पडली. परिणामी हा मार्गही काही काळासाठी बंद झाला. परिसरातील नागरिकांनी वादळाचा मोठा फटका बसल्याचे सांगितले.

## परराज्यातील प्रवासी बसवर दंडात्मक कारवाई

### लाच मागितली अशा आशयाचे वृत्त निखालस खोटे – उप प्रादेशिक परिवहन अधिकारी

लातूर । प्रतिनिधी

परराज्यातील प्रवासी बसवर दंडात्मक कारवाई करताना परिवहन विभागाच्या पथकाने लाच मागितल्याची सोशल मीडिया आणि काही वृत्त माध्यमांमध्ये प्रसारित झालेली बातमी चुकीची, दिशाभूल करणारी असल्याचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले आहे.

४ जून २०२६ रोजी सकाळी ८:३९ वाजता परराज्यातील नोंदणी असलेल्या एआर–२०–डी–३७८६ या खासगी प्रवासी बसवर महाराष्ट्र राज्याचा परवाना नसणे, कर न भरणे आणि मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाई करून ३५ हजार ९६० रुपयांचा दंड आकारण्यात आला होता. तपासणी दरम्यान पथकाने लाच मागितल्याचा दावा निराधार असून, संबंधित

पान १ वर...

## परळीतील मयत तौहीद खान यांच्या कुटुंबियांना न्याय मीळेल – धनंजय मुंडे

### कुणीही प्रकरणाला धार्मिक रंग देऊ नये – धनंजय मुंडेंचे आवाहन

परळी । प्रतिनिधी

परळी शहरातील रहिवासी, आमचा तरुण भाऊ तौहीद खान याच्या दुर्दैवी व निर्घृण हत्या प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी जेरबंद केले असून याविषयी आपण सातत्याने पोलिस अधिकाऱ्यांच्या संपर्कात होतो; तोहिदच्या मारेकऱ्यांना शिक्षा होईल व खान कुटुंबीयांना न्याय मिळेल यादृष्टीने पुढील तपास व चार्जशीट दाखल करण्याबाबत पुढेही मी पाठपुरावा करणार असल्याचे माजी मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टद्वारे म्हटले आहे.

वैद्यकीय कारणास्तव आपण मागील चार–पाच दिवस बाहेर असल्याने याबाबत व्यक्त होत आले नाही असेही धनंजय मुंडे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले असून, परळीत हिंदू–मुस्लीम सर्व समाज बांधव एकोप्याने मागील अनेक पिढ्यांपासून राहत आहेत. आमचा हा एकोपा बाधित होऊ शकत नाही त्यामुळे कृपया कोणीही या विषयाला धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहनही धनंजय मुंडे यांनी आपल्या पोस्टद्वारे केले आहे. दरम्यान मयत तौहीद खान यांस श्रद्धांजली अर्पण करत धनंजय मुंडे यांनी परळीत आल्यानंतर खान कुटुंबीयांची भेट घेणार असल्याचेही आपल्या पोस्ट मध्ये म्हटले आहे.

## पंकजा मुंडे यांच्या माजलगाव दौऱ्यात भाजपमधील गटबाजीची चर्चा; स्वागतावेळी स्वतंत्र वेगवेगळे गट सक्रिय

माजलगाव । प्रतिनिधी

अधिक मासानिमित्त तीर्थक्षेत्र पुरुषोत्तम पुरी येथे भगवान पुरुषोत्तमांचे दर्शन घेण्यासाठी राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे या माजलगाव तालुक्यात आल्या होत्या. मात्र त्यांच्या या धार्मिक दौऱ्यादरम्यान भाजपमधील स्थानिक गटबाजी पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरली. माजलगाव विधानसभा मतदारसंघात प्रवेश करताच विविध ठिकाणी लागलेले स्वतंत्र स्वागत फलक, बॅनर आणि वेगवेगळ्या गटांकडून करण्यात आलेले स्वागत यामुळे पक्षातील अंतर्गत मतभेद उघडपणे समोर आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

पंकजा मुंडे यांच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर



मतदारसंघातील विविध कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात स्वागताची तयारी केली होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना स्वागताचे फलक आणि बॅनर झळकत होते. मात्र हे स्वागत एकसंघ स्वरूपात दिसून आले नाही. विविध गटांनी स्वतंत्रपणे बॅनरबाजी करत आपली ताकद दाखविण्याचा प्रयत्न केल्याचे चित्र पाहायला मिळाले.


विशेषत भाजपमध्ये नुकतेच प्रवेश केलेले आणि विधानसभा प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळत असलेले माधव निर्मळ यांनी आपल्या समर्थकांसह मोठ्या प्रमाणात बॅनरबाजी करत पंकजा मुंडे यांचे स्वागत केले. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक ठिकाणी स्वागताचे फलक लावण्यात आले होते. त्यामुळे त्यांच्या गटाची उपस्थिती ठळकपणे जाणवत होती.

दुसरीकडे, भाजपमधील काही जुने पदाधिकारी आणि कार्यकर्ते मात्र माधव निर्मळ यांच्या गटात सहभागी झाले नाहीत. त्यांनी स्वतंत्रपणे वेगवेगळ्या ठिकाणी उभे राहून पंकजा मुंडे यांचे स्वागत केले. त्यामुळे पक्षातील दोन किंवा अधिक गट स्पष्टपणे सक्रिय असल्याचे चित्र दिसून आले. भगवान पुरुषोत्तम दर्शन दौऱ्याच्या निमित्ताने सर्व कार्यकर्ते एकत्र

पान १ वर...

मराठवाडा मुक्ती संग्रामाचे तुम्ही तेजस्वी दीप होता.
प्रामाणिकपणा, समाजसेवेचा वसा, आयुष्यभर जपताना स्वतःच्या कुटुंबाला उभारी देणारे हात आज जरी थांबले तरी तुमच्या विचारांची ताकद आमच्या प्रत्येक पावलात आहे.

सर्व नातेवाईक, आप्तेष्ठ, मित्र परिवारास कळविण्यात येते की



जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक
कै.तात्याभाऊ निवृत्ती पोकळे
यांचे
प्रथम वर्षश्राध्द

मृत्यू दिनांक : १७/०६/२०२५

मिती अधिक जेष्ठ कृ. ।।७।। शके १९४८ रविवार दि. ०७/०६/२०२६ रोजी करण्याचे योजिले आहे. तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

* दुःखांकित *
श्री. कल्याण तात्याभाऊ पोकळे (मुलगा)
सौ. शितल कल्याण पोकळे (सून)
चि. रणजित कल्याण पोकळे (नातू)
सौ. पारुबाई नानाभाऊ घोलप (मुलगी)
सौ. मंदाबाई गहिनीनाथ गांगर्डे (मुलगी)

समस्त पोकळे परिवार



रामायणाचार्य
ह.भ.प.रामराव महाराज ढोक (नागपूर)
यांचे सकाळी १० ते १२ हरिकीर्तन होईल.

! बोडखे प्रेस आष्टी 82 37 222 190

ठिकाण : म्हसोबा वस्ती, बेलगांव, ता.आष्टी, जि.बीड

## धमकीच्या व्हायरल व्हिडिओनंतर आता लाचखोरीत अडकला बळवंते अंमलदार

नेकनूर । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील वाढत्या लाचखोरीच्या घटनांमध्ये आणखी एका गंभीर प्रकरणाची भर पडली असून, नेकनूर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस अंमलदार बळवंत याला १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (–उइ) रंगेहाथ अटक केली. शनिवारी (दि. ६ जून) दुपारी नेकनूर पोलीस ठाण्याच्या आवारातच ही धडक कारवाई करण्यात आली. या घटनेमुळे जिल्हा पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे.

काम करून देण्यासाठी मागितली होती लाच

मिळालेल्या माहितीनुसार, एका प्रकरणातील कामात मदत करण्याच्या मोबदल्यात संबंधित पोलीस अंमलदाराने तक्रारदाराकडे १० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. लाच देण्यास नकार देत तक्रारदाराने जालना येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीची पडताळणी केल्यानंतर लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाल्याने एसीबीने सापळा रचला. नियोजनानुसार शनिवारी दुपारी नेकनूर पोलीस ठाण्याच्या परिसरात तक्रारदाराकडून १० हजार रुपयांची रक्कम स्वीकारताना पोलीस अंमलदार बळवंत याला एसीबीच्या पथकाने रंगेहाथ पकडले.



उपअधीक्षक जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही कारवाई जालना एसीबीचे उपअधीक्षक बाळासाहेब जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईनंतर आरोपीविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, पुढील तपास एसीबीचे अधिकारी करत आहेत.

वादग्रस्त अंमलदार पुन्हा चर्चेत

लाचखोरीच्या आरोपात अडकलेला हा पोलीस अंमलदार यापूर्वीही वादाच्या

पान १ वर...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## भाजपा ज्येष्ठ नेते नवनाथ शिराळे पाटील यांना अटकपूर्व जामीन मंजूर

बीड । प्रतिनिधी

भाजपा ज्येष्ठ नेते नवनाथ शिराळे पाटील यांना बीड जिल्हा व सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. दि. १५ मे २०२६ रोजी फिर्यादी सौ. शोभा अशोक आदमाने यांनी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात विनयभंग, मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीतील आरोप हे निराधार व



वस्तुस्थितीविरुद्ध असल्याचा दावा नवनाथ शिराळे पाटील यांच्या वतीने करण्यात आला.अटकपूर्व जामीन अर्जाच्या सुनावणीदरम्यान बचाव पक्षाने न्यायालयासमोर मांडले की, फिर्यादी व तिचे पती यांच्याशी जमीन व्यवहारासंदर्भात पूर्वीपासून आर्थिक स्वरूपाचे वाद प्रलंबित आहेत. फिर्यादी व तिच्या पतीकडे सन २०२२ मधील ०.०५ आर क्षेत्राच्या जमिनीसंदर्भातील

पान १ वर...

# कै.तात्याभाऊ निवृत्ती पोकळे : मराठवाडा मुक्ती संग्रामाचे तेजस्वी दीप

## प्रथम वर्षश्राद्धानिमित्त धार्मिक व स्मृतिप्रीत्यर्थ कार्यक्रमांचे आयोजन

आष्टी । प्रतिनिधी

मराठवाडा मुक्ती संग्रामातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, राष्ट्रप्रेम, समाजसेवा, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठेचे मूर्तिमंत प्रतीक असलेले कै. तात्याभाऊ निवृत्ती पोकळे यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त रविवार, दि. ७ जून २०२६ रोजी बेलगाव (ता. आष्टी) येथील म्हसोबा वस्ती येथे विविध धार्मिक, आध्यात्मिक आणि स्मृतिप्रीत्यर्थ कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम केवळ धार्मिक विधींचा नसून एका महान स्वातंत्र्यसैनिकाच्या जीवनकार्याचे स्मरण, त्यांच्या विचारांचे जतन आणि त्यांच्या समाजसेवेच्या परंपरेला मानवंदना देणारा ठरणार आहे.

कै. तात्याभाऊ निवृत्ती पोकळे हे मराठवाडा मुक्ती संग्रामातील एक निष्ठावंत सैनिक होते. निजामशाहीच्या अन्यायाविरुद्ध लढताना त्यांनी आपल्या आयुष्याचा मोठा भाग राष्ट्रकार्यासाठी समर्पित केला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही त्यांनी समाजसेवेची वाट सोडली नाही. समाजातील दुर्बल, वंचित आणि गरजू घटकांसाठी ते कायम कार्यरत राहिले. गावातील सामान्य नागरिकांच्या अडीअडचणी सोडविणे, सामाजिक सलोखा टिकविणे, शैक्षणिक आणि लोकहिताच्या उपक्रमांना प्रोत्साहन देणे यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. त्यांचे संपूर्ण जीवन हे त्याग, सेवा आणि माणुसकीच्या मूल्यांचे जिवंत उदाहरण होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील साधेपणा, नम्रता, लोकांशी असलेला जिव्हाळा आणि मदतीसाठी सदैव तत्पर असलेली वृत्ती यामुळे त्यांनी जनमानसात अढळ स्थान निर्माण केले होते. कोणत्याही व्यक्तीची सामाजिक किंवा आर्थिक परिस्थिती न पाहता मदतीचा हात पुढे करणे हा त्यांचा स्वभाव होता. त्यामुळेच बेलगाव परिसरासह संपूर्ण आष्टी तालुक्यात त्यांना विशेष मान आणि आदर प्राप्त झाला होता.

आज त्यांच्या निधनानंतरही त्यांचे विचार आणि संस्कार समाजामध्ये जिवंत आहेत. विशेष म्हणजे त्यांचा हा अमूल्य वारसा त्यांचे सुपुत्र श्री. कल्याण तात्याभाऊ पोकळे अत्यंत जबाबदारीने आणि निष्ठेने पुढे नेताना दिसत आहेत. वडिलांनी आयुष्यभर जपलेली समाजसेवा, लोकांशी असलेला जिव्हाळा, प्रामाणिकपणा, शांत स्वभाव आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांबद्दल असलेली संवेदनशीलता हे सर्व गुण श्री. कल्याण पोकळे यांच्या व्यक्तिमत्त्वात प्रकर्षाने दिसून येतात.



कै. तात्याभाऊ पोकळे यांनी आपल्या मुलांना केवळ कौटुंबिक मूल्ये दिली नाहीत, तर समाजासाठी जगण्याची शिकवण दिली. त्याच शिकवणीचा प्रभाव आज श्री. कल्याण पोकळे यांच्या कार्यातून स्पष्टपणे दिसून येतो. वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांनी समाजहिताचे कार्य हेच आपले कर्तव्य मानले आहे. कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता ते सामाजिक, धार्मिक आणि लोकहिताच्या उपक्रमांमध्ये सातत्याने सहभाग घेत असतात. समाजातील गरजू व्यक्तींना मदत करणे, सामाजिक सलोखा वृद्धिंगत करणे, युवकांना मार्गदर्शन करणे आणि लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे यामध्ये त्यांचा नेहमीच पुढाकार असतो.

श्री. कल्याण तात्याभाऊ पोकळे हे शांत, संयमी, अभ्यासू आणि विचारशील व्यक्तिमत्त्व म्हणून परिसरात परिचित आहेत. त्यांच्या बोलण्यात आणि वागण्यात वडिलांकडून मिळालेल्या संस्कारांची छाप स्पष्टपणे जाणवते. ते प्रत्येक व्यक्तीशी आदराने वागतात आणि कोणत्याही विषयाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहतात. त्यांच्या स्वभावातील साधेपणा आणि नम्रता यामुळे समाजातील सर्व स्तरांतील लोक त्यांच्याशी सहज जोडले जातात.

आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी होत चाललेल्या युगात वडिलांनी जपलेली मूल्ये टिकवून ठेवणे हे मोठे आव्हान असते. मात्र श्री. कल्याण पोकळे यांनी हे आव्हान यशस्वीपणे स्वीकारले आहे. त्यांनी आपल्या वडिलांच्या विचारांना केवळ स्मरणात ठेवले नाही, तर त्यांना प्रत्यक्ष कृतीत उतरविले आहे. समाजातील प्रत्येक घटकाशी आत्मीयतेने वागणे, लोकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे आणि लोकहितासाठी वेळ देणे ही त्यांची जीवनशैलीच बनली आहे.

कै. तात्याभाऊ पोकळे यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करताना अनेक नागरिक एक भावना व्यक्त करतात की, तात्याभाऊंचे विचार आणि संस्कार आजही जिवंत आहेत आणि ते श्री. कल्याण पोकळे यांच्या रूपाने समाजात कार्यरत आहेत. वडिलांनी रुजविलेली माणुसकी, प्रामाणिकपणा आणि समाजसेवेची बीजे आजही फुलताना दिसत आहेत.

कै. तात्याभाऊ पोकळे यांचे १७ जून २०२५ रोजी निधन झाले असले तरी त्यांच्या विचारांची ज्योत आजही तेवत आहे. त्यांनी दिलेले संस्कार, राष्ट्रप्रेमाची शिकवण आणि समाजसेवेची प्रेरणा पुढील पिढ्यांसाठी दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरत आहे. त्यांच्या स्मृती जतन करत त्यांचा वारसा पुढे नेण्याचे कार्य श्री. कल्याण तात्याभाऊ पोकळे आणि समस्त पोकळे परिवार अत्यंत निष्ठेने करीत आहेत.प्रथम वर्षश्राद्धानिमित्त सकाळी धार्मिक विधी, पूजन, स्मरण कार्यक्रम आणि श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे. तसेच सुप्रसिद्ध रामायणाचार्य ह.भ.प. रामराव महाराज ढोक (नागपूर) यांचे सकाळी १० ते १२ या वेळेत हरिकीर्तन आयोजित करण्यात आले आहे. या कीर्तनातून अध्यात्म, नैतिक मूल्ये, संस्कार, राष्ट्रप्रेम आणि समाजप्रबोधनाचा संदेश दिला जाणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन त्यांचे सुपुत्र श्री. कल्याण तात्याभाऊ पोकळे, सून सौ. शीतल कल्याण पोकळे, नातू चि. रणजित कल्याण पोकळे, कन्या सौ. पारूबाई नानाभाऊ घोलप, सौ. मंदाबाई गहिनीनाथ गांगर्डे तसेच समस्त पोकळे परिवार यांच्या वतीने करण्यात आले असून सर्व नातेवाईक, मित्रपरिवार, ग्रामस्थ व हितचिंतकांनी उपस्थित राहून या महान स्वातंत्र्यसैनिकाच्या स्मृतींना अभिवादन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

कै. तात्याभाऊ निवृत्ती पोकळे यांचे संपूर्ण जीवन हे राष्ट्रभक्ती, प्रामाणिकपणा, समाजसेवा आणि मानवी मूल्यांचे जतन यासाठी समर्पित होते. त्यांचा आदर्श आजही अनेकांना प्रेरणा देत आहे. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत समाजहितासाठी सातत्याने कार्यरत असलेले त्यांचे सुपुत्र श्री. कल्याण तात्याभाऊ पोकळे हे त्या महान परंपरेचे खरे वारसदार ठरत असून, समाजसेवेचा हा प्रवास भविष्यातही अशाच निष्ठेने सुरू राहील, अशी अपेक्षा आणि विश्वास परिसरातील नागरिक व्यक्त करीत आहेत.

शब्दांकन...
**– राजेंद्र लाड,आष्टी**
(९४२३१७०८८५)

# संपादकीय....

## रे क्षणांच्या संगतीने मी असा भारावलो...

सुमन कल्याणपूर यांची एका मुलाखतीच्या निमित्ताने भेट झाली. खार येथील त्यांच्या घरी जेव्हा ही भेट झाली तेव्हा त्यांच्या राजघराण्यात शोभावे अशा रुबाबदार व्यक्तिमत्त्वाने मी प्रभावित झालो. त्यानंतर सुरू झाली शब्द, संगीत आणि सूर यांची मैफिल.

अरे संसार संसार, उतरली सांज ही धरेवरी, हले हा नंदाघरी पाळणा, मृदुल करांनी छेडित तारा, जिथे सागरा धरणी मिळते, केशवा माधवा, केतकीच्या बनी तिथे, घाल घाल पिंगा वाऱ्या... यांसारखी गाणी नुसती आठवली तरी सहज ओठावर येतात. आपण गुणगुणायला लागतो. एकेका गाण्यासोबत एक वेगळीच स्मरणयात्रा सुरू होते. पन्नाशीच्या पुढं, साठीच्या उंबरठ्यावर असलेल्या अनेकांना कळत्या वयात आपलं भावविश्व समृद्ध करणारी ही गाणी भूतकाळात घेऊन जातात. बहुतांश रेडिओवर ऐकलेली ही गाणी लोकगीतांप्रमाणं लोकप्रिय झाली. ही गाणी गायलीत सुमन कल्याणपूर यांनी. रेडिओ होता तेव्हा श्रेयनामावलीतून त्यांचं नाव कानावर यायचं. रेडिओचं प्रस्थ कमी झालं आणि श्रेयनामावली जाऊन नुसती गाणीच उरली. लता मंगेशकर, आशा भोसले, उषा मंगेशकर यांच्या चलतीच्या काळात सुमनताईंनी आपली वेगळी ओळख निर्माण केली.

साधारणपणे १९५४ ते १९८४ असा तीन दशकांचा काळ गाजवणाऱ्या सुमनताईंनी वयाच्या ८९ व्या वर्षी जगाचा निरोप घेतला. सुमनताईंनी गाणं थांबवून चाळीस वर्षे झाली होती. मात्र त्यांची गाणी आजही लोकप्रिय आहेत आणि त्या गाण्यांसोबत त्यांच्या आठवणीही रसिकांसोबत होत्या. चाळीस वर्षांपूर्वी त्यांचं गाणं थांबलं होतं. आता त्यांचा जीवनप्रवास थांबला. त्यांची गाणी मात्र पुढच्या अनेक पिढ्यांचं भावविश्व समृद्ध करीत राहतील.

अशा या महान गायिकेला भेटण्याचा योग एका मुलाखतीच्या निमित्तानं आला. संगीतकार दशरथ पुजारी यांचं निधन १३ एप्रिल २००८ रोजी झालं. दशरथ पुजारी यांची अनेक गाणी सुमनताईंनी गायली आहेत. ती लोकप्रियही आहेत. सुमनताईंकडून दशरथ पुजारी यांच्यासंदर्भातील आठवणीवजा लेख हवा होता. त्यानिमित्त त्यांना भेटण्याचा योग आला. अठरा वर्षे उलटून गेली या घटनेला. त्यावेळी ना स्मार्टफोन होते, ना रेकॉर्डिंगची सवय. मुलाखतीची साधनं असली तरी पत्रकार कागदावरच मुद्दे उतरून घ्यायचे. माझंही काही वेगळं नव्हतं.

फोनवरून संपर्क साधल्यावर हो-नाही करत त्यांनी दुसऱ्या दिवशीची वेळ दिली. खारचा पत्ता दिला. दिलेल्या वेळी पत्त्यावर पोहोचलो. फ्लॅटची बेल वाजवली. कुणीतरी दरवाजा उघडला. मी एका लॅव्हिश अपार्टमेंटमध्ये पोहोचलो होतो. जाऊन बसलो. पाणी आलं. काही मिनिटांतच सुमनताई आल्या. एखाद्या राजघराण्यात शोभावं असं रुबाबदार व्यक्तिमत्त्व. सत्तरीतलं खानदानी सौंदर्य. वात्सल्यमूर्ती. मंद हसल्या.

# यंदा शासकीय अनुदानातील बियाणे वेळेपूर्वी उपलब्ध करण्याची शेतकऱ्यांची मागणी

## डिझेल टंचाई आणि खतांच्या वाढत्या दरामुळे शेतकरी आर्थिक संकटात यावर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा

नायगाव । श्याम पा.चोंडे

राज्यात मान्सूनच्या आगमनाची चाहूल लागताच बळीराजा खरीप हंगामाच्या तयारीला लागतो. दरवर्षीप्रमाणे यंदाही महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी अनुदानावर बियाणे वितरित केले जाणार आहे. मात्र, दरवर्षी शासकीय बियाणे उपलब्ध होईपर्यंत बहुतांश शेतकऱ्यांच्या पेरण्या आधीच आटोपलेल्या असतात. त्यामुळे यंदा तरी शासकीय अनुदानातील बियाणे वेळेपूर्वी उपलब्ध करून द्यावेत, अशी जोरदार मागणी शेतकरी पुत्र राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गजानन पाटील होटाळकर यांनी केली आहे.

सध्या खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकरी आधीच आर्थिक संकटाचा सामना करत आहे. एकीकडे डिझेलची टंचाई आणि वाढते दर, तर दुसरीकडे रासायनिक खतांच्या गगनाला भिडलेल्या किंमती यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून मिळणारे अनुदानित बियाणे वेळेत मिळाले, तर शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळू शकतो, अशी भावना होटाळकर यांनी व्यक्त केली आहे.

'पीक पेरून झाल्यावर बियाणे हाती'

कृषी विभागाकडून महाबीज आणि इतर मान्यताप्राप्त संस्थांच्या माध्यमातून खरीप हंगामासाठी सवलतीच्या दरात बियाणे वितरित केले जाते. मात्र, शासकीय प्रक्रिया, प्रशासकीय मंजुरी आणि पुरवठ्यात होणारा विलंब यामुळे पावसाळा सुरू झाल्यानंतरच बियाणे उपलब्ध होतात. तोपर्यंत अनेक शेतकरी जूनच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात बाजारातून महागडे बियाणे खरेदी करून पेरणी उरकून घेतात. परिणामी, जुलै महिन्यात मिळणाऱ्या शासकीय बियाण्यांचा शेतकऱ्यांना फारसा उपयोग होत नाही असे शेतकरी पुत्रांनी खंत व्यक्त केली आहे.

शासनाचा हेतू शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याचा असला तरी नियोजनाच्या अभावामुळे या योजनेचा अपेक्षित लाभ शेतकऱ्यांपर्यंत वेळेत पोहोचत नाही, अशी नाराजी होटाळकर यांनी व्यक्त केली आहे.

यंदाचे संकट दुहेरी

डिझेल टंचाई आणि महागडी खते

यंदाचा खरीप हंगाम शेतकऱ्यांसाठी अधिकच आव्हानात्मक ठरत आहे.

ट्रॅक्टरद्वारे मशागत, पेरणी आणि इतर शेती कामांसाठी डिझेलची मोठ्या प्रमाणावर गरज भासते. मात्र, सध्या डिझेलचा तुटवडा आणि वाढलेले दर यामुळे शेती मशागतीचा खर्च वाढला आहे.

खतांचे वाढलेले भाव

२०:२०:००(१३), १२:३२:१६, १४:३५:१४, १०:२६:२६ आणि संयुक्त खतांच्या किंमतीत मोठी वाढ झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक बजेट कोलमडले आहे. खतांसाठी अतिरिक्त खर्च करावा लागत असल्याने शेतकरी आधीच अडचणीत सापडला आहे.

आधीच खते आणि डिझेलसाठी खिसा रिकामा झाला आहे. त्यात जर वेळेवर शासनाचे अनुदानातील बियाणे मिळाले नाही, तर पुन्हा बाजारातून व्याजाने पैसे काढून महागडे बियाणे खरेदी करावे लागतील. शासनाने यंदा तरी वेळेपूर्वी बियाणे उपलब्ध करून द्यावेत, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

वेळेआधी बियाणे उपलब्ध झाल्यास होणारे फायदे..

कृषी विभागाने जूनच्या पहिल्या आठवड्यातच बियाणे वितरण सुरू केले, तर शेतकऱ्यांना अनेक फायदे होऊ शकतात.तसेच महागड्या खाजगी बियाण्यांवर अवलंबून राहावे लागणार नाही. ऐन पेरणीच्या काळात होणारा तुटवडा आणि काळाबाजार थांबेल. बियाणे आधीच उपलब्ध असल्याने पावसाचा अंदाज येताच शेतकरी तातडीने पेरणी करू शकतील. तसेच वेळेवर पेरणी झाल्यास पीक उत्पादन वाढण्यास मदत होईल.

शेतकऱ्यांची सरकारकडे आर्त हाक..

यंदाची बिकट परिस्थिती पाहता कृषी मंत्री आणि संबंधित प्रशासनाने तातडीने बैठक घेऊन बियाणे वाटपाची प्रक्रिया गतिमान करावी, अशी मागणी शेतकरी पुत्र संघर्ष समितीकडून होत आहे.

डिझेल टंचाई, खतांची महागाई आणि आर्थिक अडचणींनी होरपळणाऱ्या बळीराजाला जर वेळेत शासकीय अनुदानातील बियाणे मिळाले, तर त्याचा खऱ्या अर्थाने फायदा होईल. त्यामुळे शासनाने यंदा तरी नियोजनबद्ध पद्धतीने बियाणे वितरण करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज, जि.बीड

## जाहीरनामा

सर्व जनता मौजे लाडेवडगाव ता. केज यांना जाहीर केले जाते की, लाडेवडगाव येथील जन्म पावलेला इसम नामे दत्तात्रय रामधन शेप याचा स्वतःचा जन्म दिनांक-२५/१२/१९८७ रोजी मौजे लाडेवडगाव ता. केज येथे झालेला असुन व जन्म नोंद आदेश ग्रामपंचायत अधिकारी ग्राम पंचायत लाडेवडगाव यांना देणे बाबत दत्तात्रय रामधन शेप रा. लाडेवडगाव ता. केज यांनी स्वतः या कार्यालयास दि.२३.०३.२०२६ रोजी अर्ज सादर करुन सोबत ग्राम पंचायत लाडेवडगाव यांचे जन्म नोंद नसल्याचे प्रमाण पत्र व नोटरी करुन शपथपत्र . सादर करुन ग्राम पंचायत लाडेवडगाव ता. केज यांना त्यांच्या स्वतःची जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे.

२/- दत्तात्रय रामधन शेप याचा जन्म नोंद घेणे. बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व ग्राम पचायत लाडेवडगाव ता. केज यांना जन्म नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी, केज**

## जाहिर प्रगटन

माझे पक्षकार सलमान मेहमुद शेख यांनी दिलेल्या माहिती, कागदपत्रे व अधिकारावरून सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझ्या पक्षकाराने नामे फातेमा गुलाम हुसेन पठाण यांच्या नावे असलेली कस्बे अंबड ता. अंबड जि. जालना येथील सर्वे नं. ०६ मधील सहान प्लॉट नं. ५१ ज्याची लांबी पुर्व-पश्चिम ४० चौ. फुट व रूंदी दक्षिण-उत्तर २० चौ. फुट ज्याचे एकुण ८०० चौ. फुट व सदर प्लॉटच्या चतुः सिमा पुर्वेस-कॉलनी अंतर्गत रस्ता, पश्चिमेस प्लॉट नं. ५८, दक्षिणेस-प्लॉट नं. ५२, उत्तरेस-प्लॉट नं. ५० या चतुः सिमेच्या आतील प्लॉट खरेदी करण्याचा करार केलेला आहे. सदर प्लॉट हा नोटरीआधारे दि.२२/०५/२०२६ रोजी ज्याचा नोटरी क्र.१४५५/२०२६ असा आहे. सदर प्लॉट रक्कम ३,५०,०००/- रूपयामध्ये आज रोजी नगदी व रोख वसुल झाले आहे. सदर प्लॉट चा मालकी व ताबा माझे पक्षकार यास मिळालेला आहे. सदर नोटरीकृत करारनाम्याआधारे माझे पक्षकार प्लॉट नं. ५१ चे मालक व कब्जेदार झाले असुन सदरील प्लॉटचे उपरोक्त मालकाऐवजी इतर अन्य कोणी मालक अथवा हिस्सेदार किंवा सदर प्लॉटसंबंधी आपल्या कोणाचाही कसल्याही प्रकारे हक्कसंबंध जसे गहाण, तारण, कर्ज, बक्षीस, चोळी बांगडी इत्यादी काहीही असल्यास आपण सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द केल्याच्या तारखेपासुन ०७ दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप नोंदवावा नंतर येणाऱ्या आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व सदर मिळकत ही निर्विवाद आहे असे गृहीत धरून सदर प्लॉट हा माझे पक्षकाराचा मालकी व ताब्याआधारे झालेला असल्याने सबब हे जाहिर प्रगटन देण्यात येत आहे.

दि.०४/०६/२०२६

मार्फत
स्वाक्षरित/-
ॲड. सलीम के. शेख, अंबड
सावित्रीबाई फुले मार्ग, अंबड
ता. अंबड जि.
जालना-८९७५७५१६६६

**जाहीर प्रगटन देणार**
**स्वाक्षरित/-**
**सलमान मेहमूद शेख**
**मो.नं. ८७९३५०९७३६**

## टीसी हरवला आहे

जगताप अभिषेक दशरथ या नावाचा इयत्ता दहावी पासचा टीसी वडवणी ते बीड प्रवासा दरम्यान हरवला आहे. सापडल्यास संपर्क साधावा.

मोबाईल नंबर ९० २१ ०८ ९० ३८

पान १ वरून...

**परराज्यातील प्रवासी ...**

वाहनधारकाने दंडाची ही सर्व रक्कम ऑनलाईन पद्धतीने शासनाकडे जमा केली आहे.

या वाहनावर यापूर्वीही ७ एप्रिल २०२६ रोजी ३ हजार ६५० रुपये, १३ मे २०२६ रोजी ३ हजार रुपये आणि १९ मे २०२६ रोजी ३५ हजार ९६० रुपयांचा दंड आकारण्यात आला होता, जो वाहनधारकाने नियमानुसार ऑनलाईन भरला आहे. या प्रकरणाबाबत चुकीची माहिती पसरवून विभागाची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या संबंधित वाहन चालकावर लातूर (ग्रामीण) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, नागरिकांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

**पंकजा मुंडे यांच्या...**

येतील, अशी परिस्थिती असताना प्रत्यक्षात प्रत्येक गटाने स्वतंत्र अस्तित्व दाखविण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा व माजलगाव सह परिसरात सुरू आहे.

पुरुषोत्तम पुरी येथे दर्शन आणि आरती पार पडली असली तरी कार्यकर्त्यांमधील ही दरी अनेकांच्या नजरेत भरली. स्थानिक राजकारणात आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षांतर्गत समीकरणे बदलत असल्याचे संकेत या दौऱ्यातून मिळाल्याचे जाणकारांचे मत आहे.

दरम्यान, पंकजा मुंडे यांनी आपल्या दौऱ्यात धार्मिक कार्यक्रमांवर भर दिला असून कोणत्याही गटबाजीवर सार्वजनिक भाष्य केले नाही. मात्र त्यांच्या उपस्थितीतही स्थानिक कार्यकर्ते एकत्र न आल्याने मतदारसंघात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. भाजपच्या संघटनात्मक मजबुतीसाठी पक्ष नेतृत्व आगामी काळात या मतभेदांवर तोडगा काढणार का, याकडे कार्यकर्ते आणि राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे.

माजलगाव विधानसभा मतदारसंघात पंकजा मुंडे यांच्या दौऱ्यानंतर आता पक्षातील गटबाजी आणि नेतृत्वाच्या प्रश्नावर नव्याने चर्चा सुरू झाली असून येत्या काळात स्थानिक राजकारणात याचे पडसाद उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**धमकीच्या व्हायरल ...**

भोवऱ्यात सापडला होता. काही महिन्यांपूर्वी शेतीच्या वादातून एका व्यक्तीला धमकी देतानाचा त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. त्या व्हिडिओमध्ये संबंधित व्यक्तीला तुझे कॅरेक्टर खराब करून टाकीन अशी धमकी देण्यात आल्याचा आरोप होता. त्यावेळीही त्याच्या वर्तनावर आणि अधिकाराच्या गैरवापराबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते.

आता थेट लाच स्वीकारताना एसीबीच्या जाळ्यात अडकल्याने संबंधित अंमलदार पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

जनतेत संताप, कारवाईचे स्वागत

पोलीस दलाकडून कायद्याचे पालन आणि जनतेचे संरक्षण अपेक्षित असताना अशा प्रकारच्या

पान १ वरून...

घटना समोर येत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. दुसरीकडे, एसीबीने केलेल्या धडक कारवाईचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून, भ्रष्टाचाराविरोधातील मोहिमेला यामुळे बळ मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

**भाजपा ज्येष्ठ नेते ...**

इसार पावती दहा लाखाची असल्याचे नमूद करण्यात आले. तसेच फिर्यादीच्या पतीने दिलेल्या धनादेशासंदर्भात वीस लाख रुपयांच्या निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत न्यायालयीन कार्यवाही सुरू असल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

याशिवाय, इसार पावतीच्या आधारे संबंधित रक्कम अदा करणे अथवा जमीन खरेदीखत करून देण्याबाबतचा दावा देखील न्यायप्रविष्ट असल्याचे सांगण्यात आले. या सर्व पार्श्वभूमीचा विचार करता, दाखल करण्यात आलेल्या फिर्यादीमागे इतर कारणांचा संबंध असू शकतो, असा युक्तिवाद बचाव पक्षाने न्यायालयासमोर मांडला.

मा. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद, उपलब्ध कागदपत्रे आणि प्रकरणातील परिस्थितीचा प्राथमिक विचार करून नवनाथ शिराळे पाटील यांना अटी व शर्तीसह अटकपूर्व जामीन मंजूर केला.या प्रकरणात नवनाथ शिराळे पाटील यांच्या वतीने ॲड. एस. बी. नांदे व ॲड. गोविंद शिराळे पाटील यांनी प्रभावीपणे बाजू मांडली.




**मुखेड । प्रतिनिधी**

**देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगून भारतीय सैन्यात निवड झाल्याबद्दल मुखेड तालुक्यातील दोन तरुणांचा काँग्रेस पक्षाच्या वतीने गौरव करण्यात आला. यामध्ये सुगाव कॅम्प येथील शंकर गणपतराव दिवटे आणि पैसमाळ येथील भाऊराव किशनराव पाटील यांची नुकतीच इंडियन आर्मी सेवेत निवड झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल संपूर्ण तालुक्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.यावेळी तालुका काँग्रेसचे कार्याध्यक्ष संभाजी पाटील उन्द्रीकर,काँग्रेस शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर,अशोक नगर मित्रमंडळाचे ईरफान मोमीन,राजू बनसोडे सह मित्रपरीवारांनी शुभेच्छा दिल्या.**

## अंबाजोगाई तहसीलदारांच्या अडचणीत दिवसेंदिवस वाढ

# तहसीलदार विलास तरंगेंकडून धमक्यांसह शिवराळ भाषेचा वापर

अंबाजोगाई / सुनील सिरसाट

आंबेजोगाई तहसील कार्यालयाचे तहसीलदार यांच्या अडचणीत दिवसेंदिवस वाढ होत असून तक्रारींमधे वाढ झाल्याने तहसीलदारांच्या पायाखालची वाळू सरकत असावी. कारण तहसीलदाराचा कार्यकर्त्यास थेट फोन करून शिवराळ भाषेचा वापर करत बघून घेण्याची धमकी देत असल्याची तक्रार मनसे चे माजी तालुकाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते गोविंद शेप यांनी केली आहे.

अलीकडच्या काळात अंबाजोगाईच्या तहसीलदार विलास तरंगे यांच्या बाबतीत चंद्रपूरच्या सामाजिक कार्यकर्त्या प्रिया झांबरे, आंबेजोगाईचेच रहिवासी डीडवाणी, दरम्यानच्या काळात अँड.सतीश केंद्रे, प्रहार जिल्हा संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष अशोक सोनवणे, यांच्यासह इतरही काही जणांसोबत तक्रारी झाल्या असून यापैकी काही जणांना शिवराळ भाषेचा वापर करत थेट बघून घेण्याची धमकी तहसीलदार तरंगे यांनी दिल्याच्या अनेकांच्या तक्रारी आहेत. एवढेच नव्हे तर यापैकी प्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक सोनवणे यांना तर कॉलरला पकडून धक्काबुक्की केल्याचीही माहिती आहे. शिवाय सेतू सुविधा केंद्रात काम करणा-या कर्मचा-यास तर बेदम मारहाण केल्याचाही सूत्रांकडून मिळालेली माहिती असून त्याचा पुरावाही असल्याचे बोलले जात आहे. परंतु तो बाहेर आणण्यास आवकाश आहे. गरज पडल्यावर ऐनवेळी त्याचा वापर करणार असल्याचे नाव न सांगण्याच्या अटीवर एक जणांनी आमच्या प्रतिनिधीला सांगितले. मग अशातच काल-परवा कुठल्यातरी एका व्यवहाराच्या देवाणघेवाणीवरून आंबाजोगाईच्या तहसीलदार महोदयांनी दारूच्या नशेत त्यांच्या संबंधित असणाऱ्या व्यक्तीला कॉन्फरन्स कॉलवर घेऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे आंबाजोगाई माजी तालुकाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते गोविंद रामभाऊ शेप यांना भोसडीच्या, कुत्र्या, चोरट्या, भामट्या, नालायका, तुला लाज वाटते का रे., तू उद्या माझ्या कार्यालयात ये, भिकाऱ्या मग तुला सांगतो लोकांचे पैसे घेतो का..? जर ताबडतोब पैशाचा व्यवहार नाही मिटवलास तर तुझी गाठ माझ्याशी आहे याद राख. अशा भाषेत संभाषण करून जाब विचारल्याचे गोविंद शेप आपल्या तक्रारीत नमुद केले आहे. शेप यांची मानसिकता ढासळली असून त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक बीड, यांच्यासह जिल्हाधिकारी बीड, अप्पर मुख्य सचिव महसूल विभाग, मुंबई विशेष पोलीस महानिरीक्षक छत्रपती सभाजीनगर यांच्यासह अन्य वरिष्ठांकडे तहसीलदाराची तक्रार केली आहे.



तहसिलदारकडून मोठ्या प्रमाणात मलिद्याचा पुरवठा तर होत नाहीये ना...?

आंबेजोगाई तहसीलदार विलास तरंगे यांनी त्यांच्या कार्यकाळात आंबेजोगाई मध्ये गैरमार्गाने काही प्रकरणे केली असून त्या माध्यमातून करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी चंद्रपूर येथील सामाजिक कार्यकर्त्या प्रिया झांबरे यांनी उपजिल्हाधिकारी आंबेजोगाई पासून ते महसूल सचिव आणि मंत्री महोदयापर्यंत केल्याने आणि सातत्याने त्याचा पाठपुरावा केल्याने वरिष्ठांकडून याबाबतीत वारंवार तहसीलदार यांना विचारणा होत असल्याने तहसीलदार विलास तरंगे यांच्या पायाखालची जमीन नक्कीच सरकल्याचे आता त्यांच्या या अशा असभ्य वर्तुणुकीवरून आणि घसरलेल्या वाणीवरून दिसून येत आहे. मग आपण केलेल्या चुकीच्या कामाबाबत किंवा केलेल्या भ्रष्टाचारा बाबतीत वरिष्ठांकडे दाद मागायची नाही. मी जे करील तेच कायदा. मी तालुक्याचा कार्यकारी दंडाधिकारीच नाही तर मी तालुक्याचा सर्वेसर्वा आहे. असेच काहीस स्वतःला समजून अलीकडच्या काळात त्यांची हुकूमशासारखी वर्तनुक असल्याच्या अनेकांनी तोंडी तक्रारी केल्या असून आंबेजोगाई शहरासह तालुकाभरात जागोजाग आंबेजोगाईचे तहसीलदार हे जनतेचे नोकर नसून जनताच जणू काय त्यांच्या शेतातील सालगडी आहे. अशा अविर्भावात ते वागत-बोलत असल्याचे सूर सर्वत्र ऐकावयास मिळत आहेत. मग एकीकडे तहसीलदार विलास तरंगे यांच्या अशा वर्तणुकीमुळे केवळ त्यांचीच नाही, तर संपूर्ण बीड जिल्हा महसूल प्रशासनाची बदनामी होत असून, आता तर संपुर्ण महसूल खात्याची बदनामी होत आहे. तरीसुद्धा वरिष्ठ महसूल प्रशासन अधिकारी आणि ना.महसूल मंत्री महोदय तहसीलदारांवरती कसलीही कारवाई करायला तयार नाहीत. मग वरिष्ठ महसूल प्रशासन अधिकाऱ्यांना तहसीलदारांकडून मलिद्याचा तर पुरवठा होत नाही ना..?

# मयत भावाला कागदावर जिवंत करुन जमीन-बोअरवेल हडपली

### पुतण्या-मुंद्राक विक्रेता ,नोटरी वकिल, तलाठी-मंडळ अधिकाऱ्यासह ७ जणांविरुद्ध धारूर पोलीस ठाण्यात तक्रार !

धारूर /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यात महसुली भ्रष्टाचाराचा कळस करणारी घटना समोर आली आहे. मयत व्यक्तीला कागदोपत्री जिवंत दाखवून बोगस दस्तऐवज तयार करून वडिलोपार्जित जमीन व बोअरवेल हडपण्याचा धक्कादायक प्रकार* उघडकीस आला आहे. या प्रकरणी मयताच्या सख्ख्या भावाने शुक्रवारी दि.५ रोजी धारूर पोलीस ठाण्यात पुतण्या, नोटरी वकील, मुद्रांक विक्रेता, तत्कालीन तलाठी व मंडळ अधिकाऱ्यासह ७ जणांविरुद्ध लेखी तक्रार दाखल करून गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की,

वाघोली ता. धारूर येथील रहिवासी कै. आबासाहेब बाबुराव गव्हाणे यांचे दि. १८/०९/२०२१ रोजी निधन झाले.त्यांच्या मृत्यूनंतर सह दिवाणी न्यायाधीश, धारूर यांच्या न्यायालयाने दि. १४/१२/२०२१ रोजी वारसा प्रमाणपत्र निर्गमित करून त्यांचे कायदेशीर वारस म्हणून मुलगे अशोक, गोकुळ व नितीन यांची नोंद केली. मात्र, वाघोली येथील सर्व्हे नं. २४६ मधील ६१ गुंठे वडिलोपार्जित जमीन ही कै. आबासाहेब व त्यांचे भाऊ मधुकर बाबुराव गव्हाणे यांच्या सामायिक मालकीची असून त्यात सामायिक बोअरवेल आहे. या जमिनीची अद्याप कायदेशीर वाटणी झालेली नाही.

मयताला जिवंत करून घोटाळा कसा केला ?

तक्रारदार मधुकर गव्हाणे यांच्या आरोपानुसार, आरोपी पुतण्या अशोक आबासाहेब गव्हाणे याने चुलत्याचा हिस्सा हडपण्यासाठी संगनमताने कट रचला दि. १०/०७/२०२४ रोजी मयत आबासाहेब गव्हाणे यांच्या नावाने हस्ते खुद्द असे लिहून मुद्रांक विक्रेते आर. एन. मोरे यांच्याकडून १०० रु. चा बॉण्ड खरेदी केला. त्यावर मयत व्यक्तीची इंग्रजी स्वाक्षरी दाखवली.

त्याच दिवशी नोटरी ड. मंगल एच. नेहरकर यांनी कोणतीही शहानिशा न करता मयत व्यक्तीच्या नावाने बोअरवेल नोंदीसाठी शपथपत्र नोटरी केले. त्यावर मयताची मराठीत साधी स्वाक्षरी आहे.

तत्कालीन तलाठी शरद जानकीराम राठोड यांनी दि. १८/०७/२०२४ रोजी मयत व्यक्तीच्या नावाचा अर्ज स्वीकारला. अर्जावर इंग्रजीत किचकट स्वाक्षरी असून वर दि. १७/०७/२०२४ व खाली दि. १८/०७/२०२६ अशा विसंगत तारखा आहेत. तत्कालीन मंडळ अधिकारी लहू भीमराव केदार यांनी दि. २७/०८/२०२४ रोजी कोणतीही शहानिशा न करता फेरफार क्र. १०८२ मंजूर केला. यामुळे फिर्यादी मधुकर गव्हाणे यांचा बोअरवेल मधील कायदेशीर हिस्सा संपुष्टात आला.

७ जणांवर अजामीनपात्र गुन्हे दाखल होणार ?

१. अशोक आबासाहेब गव्हाणे, पुतण्या २. ड. मंगल एच. नेहरकर, नोटरी ३. आर. एन. मोरे, मुद्रांक विक्रेता ४. शरद जानकीराम राठोड, तत्कालीन तलाठी ५. लहू भीमराव केदार, तत्कालीन मंडळ अधिकारी ६. धर्मराज अप्पाराव कुटूळे, (साक्षीदार )७. अशोक संदिपान शिंदे, (साक्षीदार )

या जणांविरुद्ध तक्रारदार मधुकर गव्हाणे यांनी दि. ०५/०६/२०२६ रोजी धारूर पोलीस ठाण्यात तक्रारीत पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८ फसवणूक, ३३६ बनावट दस्त तयार करणे, ३३७ बनावट दस्त वापरणे, ३३८ महत्वाच्या दस्ताची बनावट, ६१ गुन्हेगारी कट, ३(५) सामाईक हेतू अन्वये अजामीनपात्र गुन्हा नोंदवुन कायदेशीर कारवाई करावी असी लेखी मागणी केली आहे.

मरणोत्तर विटंबना - तक्रारदाराचा आरोप

माझ्या भावाचा मृत्यू २०२१ ला झाला. कोर्टाने वारसा प्रमाणपत्र दिले. तरीही माझ्या पुतण्याने नोटरी, तलाठी, मंडळ अधिकारी यांना हाताशी धरून माझ्या भावाला कागदावर जिवंत केले. माझ्या हक्काची जमीन व बोअरवेल हडपण्यासाठी मरणोत्तर माझ्या भावाची विटंबना केली. मी न्यायासाठी उंबरठे झिजवले पण न्याय मिळाला नाही,अशी व्यथा तक्रारदार मधुकर गव्हाणे यांनी मांडली.

क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांची मागणी

सर्व आरोपींना तात्काळ अटक करून सखोल चौकशी करावी.,२. तलाठी व मंडळ अधिकारी यांचे निलंबन करून खातेनिहाय चौकशी करावी.,३. नोटरी वकिलाचा परवाना रद्द करण्यासाठी विधी विभागाकडे शिफारस करावी,४.मुंद्राक विक्रेता यांचा परवाना रद्द करावा.

महसूल विभागातील अधिकाऱ्यांनीच मयताला जिवंत दाखवून जमीन हडपण्यास मदत करणे हा नीचपणाचा कळस आहे. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी अशा प्रकारे बळकावल्या जात असतील तर सामान्य शेतकऱ्याने न्याय कुणाकडे मागायचा ? असा संतप्त सवाल क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी केलाय.



## पर्यावरण दिनानिमित्त सुखना नदी काठावर वृक्षरोपण

छत्रपती संभाजीनगर (जिमाका)

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सुखना नदीच्या काठावर आज वृक्षरोपण करण्यात आले. यावेळी भारतीय वंशाच्या अडीच हजारांहून अधिक वृक्षरोपांचे रोपण करण्यात आले.

यावेळी महापौर समीर राजूरकर,आमदार अनुराधा चव्हाण, विभागीय आयुक्त जी श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे, उपआयुक्त नंदकिशोर भोंबे, विकास नवाळे, शहर अभियंता संजय कोंबडे, अपर्णा थेटे, उद्यान अधीक्षक विजय पाटील, मुख्य लेखा अधिकारी संतोष वाहुळे आदी उपस्थित होते. पर्यावरण संवर्धन आणि हरित शहर निर्मितीच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमात नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख व महंत विठ्ठल महाराज यांच्या उपस्थितीत गहिनीनाथ गडावर वृक्षारोपण

### ‘एक पेड माँ के नाम’ उपक्रमाला प्रतिसाद

पाटोदा । प्रतिनिधी

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणादायी ‘एक पेड माँ के नाम’ या उपक्रमाला व लोकनेते नामदार पंकजाताई मुंडे यांनी गोपीनाथ गडावर केलेल्या आव्हानाला प्रतिसाद देत तसेच पंतप्रधानांच्या यशस्वी बारा वर्षांच्या लोककल्याणकारी कार्यकाळानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने बीड जिल्हाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

त्याचाच एक भाग म्हणून क्षेत्र गहिनीनाथ गड, ता. पाटोदा येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे, मा.खा. प्रीतम ताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली



आयोजित या कार्यक्रमात महंत विठ्ठल महाराज यांच्या शुभहस्ते भाजपा बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या उपस्थितीत सुमारे ५० वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी अनुसूचित मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अ‍ॅड. वाल्मिक निकाळजे, माजी पंचायत समिती सभापती काकासाहेब लांबरुड, जिल्हा उपाध्यक्ष लालासाहेब कुमकर, मधुकर अनारसे, संदीप नागरगोजे, संतोष माळशिखरे, सरपंच मारुती सांगळे, सरपंच तात्या लाड प्रा. भरत गर्जे यांच्यासह अनेक मान्यवर, कार्यकर्ते, भाविक व पर्यावरणप्रेमी उपस्थित होते.

भाजपचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी महंत विठ्ठल महाराज यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. तसेच भारतीय जनता पार्टीच्या वतीने जिल्ह्यातील प्रत्येक बूथवर किमान पाच वृक्ष लावण्याचा संकल्प राबविण्यात आला असून जिल्हाभर मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले असल्याचे सांगितले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन केले. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि पर्यावरणीय असंतुलन यावर मात करण्यासाठी वृक्षारोपण हा सर्वात प्रभावी उपाय असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

## बीडमध्ये ऊसतोड कामगारांच्या ‘स्थलांतर पूर्व नियोजन’ बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय

### कामगारांसाठी स्वतंत्र ओळखपत्रे, आरोग्य शिबिरे, जन्मदाखले व योजनांचा लाभ मिळवून देण्यावर भर

बीड । प्रतिनिधी

ऊसतोड कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी प्रशासन व स्वयंसेवी संस्थांनी समन्वयाने काम करण्याची गरज असून, कामगारांच्या सुविधेसाठी तातडीने नवीन कार्यपद्धती (एसओपी) तयार करून लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून ओळखपत्रांचे वितरण करण्यात यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले.

मराठवाडा ग्रामीण विकास संस्था संचलित ऊसतोड कामगार प्रकल्पांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय ‘स्थलांतर पूर्व नियोजन’ समन्वय बैठकीत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहमान, सहाय्यक समाज कल्याण आयुक्त भोगले, जिल्हा आरोग्य अधिकारी गंडाळ, शिक्षणाधिकारी, महिला व



बालविकास अधिकारी, सहाय्यक कामगार आयुक्त, ऊसतोड कामगार कृती समितीचे बाजीराव ढाकणे यांच्यासह विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.बैठकीत ऊसतोड कामगारांचे स्थलांतर, आरोग्य, शिक्षण, पोषण, सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि सामाजिक सुरक्षा या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. कामगारांचा डेटा ज्या जिल्ह्यात किंवा राज्यात ते स्थलांतरित होतात, त्या प्रशासनाशी सामायिक करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव मांडण्यात आला. यामुळे स्थलांतरित कामगारांना तेथील शासकीय योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे मिळू शकेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

ऊसतोड कामगारांच्या समस्या आणि तक्रारींचे निराकरण करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या १८००२३३१२१२ या टोल फ्री हेल्पलाइन क्रमांकाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या विविध योजनांची गावागावांत व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश समाज कल्याण विभागाला देण्यात आले.

बैठकीच्या प्रारंभी जिल्हा संपर्क अधिकारी एच. पी. देशमुख यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. एमआयएस अधिकारी अनुप मोरे यांनी ऊसतोड कामगारांसमोरील समस्या, आव्हाने आणि संभाव्य उपाययोजनांवर सविस्तर सादरीकरण केले. तर अश्वजीत जाधव यांनी आभार प्रदर्शन केले.यावेळी बाजीराव ढाकणे, विशाल झीन्जूर्डे, राहुल घनघाव, ओमप्रकाश गिरी, मनीषा तोकले आदींनी ऊसतोड कामगारांच्या विविध समस्या प्रशासनासमोर मांडल्या. प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्रितपणे काम करून ऊसतोड कामगारांचे प्रश्न प्राधान्याने सोडवावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठकीच्या शेवटी केले.



सावळदबारा । प्रतिनिधी

सावळदबारा येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भारतीय जनता पार्टीचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी दि. ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन निमित्त सावळदबारा येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते,देवराव इगळे, सखाराम कोते,एकनाथ सपाटे,सुकलाल चव्हाण,समीर तडवी,समाधान टिकारे,योगेश साळुंके आदी होते.

# नेत्रदान श्रेष्ठ दान उपक्रम

### आदित्य महाविद्यालयात ९ जून रोजी विशेष व्याख्यानाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी संलग्नित तथा आदित्य शिक्षण संस्था संचलित आदित्य कृषी व संलग्न महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ‘नेत्रदान श्रेष्ठ दान’ या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे ९ जून रोजी आयोजन करण्यात आले आहे. समाजामध्ये नेत्रदानाविषयी जनजागृती निर्माण करणे, नेत्रदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे आणि जास्तीत जास्त नागरिकांना यासाठी प्रेरित करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा,संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध सामाजिक, शैक्षणिक व जनजागृतीपर उपक्रम सातत्याने राबवले जातात.त्याचाच एक भाग म्हणून या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी व मानव सेवेची भावना रुजवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. हे व्याख्यान मंगळवार, ९ जून २०२६ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत महाविद्यालयाच्या सभागृहात होणार आहे. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी उपस्थित राहणार आहेत. ते उपस्थितांना नेत्रदानाचे सामाजिक, वैद्यकीय, नैतिक व मानवतावादी महत्त्व याविषयी सविस्तर व मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा हे राहणार आहेत.या व्याख्यानास महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रासेयो विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.नेत्रदानामुळे मृत्यूनंतरही एखाद्या व्यक्तीच्या डोळ्यांमधून दुसऱ्या गरजू व्यक्तीला दृष्टी मिळू शकते. नेत्रदान ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून ती मानवतेची सर्वोच्च सेवा मानली जाते. अंधत्वाने ग्रस्त असलेल्या व्यक्तींना नवजीवन देण्याचे सामर्थ्य यात असल्याने प्रत्येकाने या विषयाकडे सकारात्मकतेने पाहण्याची गरज आहे.

# पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांची वरवटीच्या लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे गो-शाळेस भेट

## येथील विविध शेती व समाज उपयुक्त आयुर्वेदिक प्रसाधने- घटकांचे केले उद्धघाटन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई-परळी रोडवर असणाऱ्या वरवटी येथील लोकनेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे गो-शाळेस राज्याच्या पशुसंवर्धन कॅबिनेट मंत्री ना. पंकजा मुंडे यांनी धावती भेट दिली. या भेटीत त्यांनी या गोशाळेत शेती आणि समाज उपयोगी अशा विविध उपयुक्त घटकांचे उद्घाटनही केले.

गेल्या दशकापेक्षाही जास्त काळापासून वरवटी येथे एँड.अशोक मुंडे यांनी सुरू केलेल्या लोकनेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे गोशाळेस दरम्यानच्या काळात पंकजा-प्रीतम मुंडे यांना वेळेअभावी भेट देता आली नाही. परंतु योगायोगाने ना.पंकजा मुंडे यांच्याकडे पशुसंवर्धन खाते असल्याने आणि आंबेजोगाई-परळीच्या अगदी मध्यभागी वरवटी येथील अशोक मुंडे यांनी राष्ट्रीय महामार्गावरच आपल्या शेतात उभारलेल्या या गोशाळेस पंकजा मुंडे यांचे ओ. एस.डी. डॉ.विजय कराड यांच्या सांगण्यावरून राज्याच्या मंत्री पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे या बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आल्या असता या गोशाळेवर आल्या आणि एका दशकापेक्षाही जास्त कालावधीपासून सुरू असलेल्या या गो-शाळेविषयीची सर्वकाही सविस्तर जाणून घेऊन ऍड ऍड.अशोक मुंडे यांचे बंधू अमोल मुंडे, राहुल मुंडे आणि संपूर्ण परिवाराच्या माध्यमातून येथे गोमाता बचावसह गौ-संवर्धन, गो-रक्षण करत करत रासायनिक शेतीमुळे शेतीचा खालावलेला दर्जा सुधारावा म्हणून एँड.मुंडे यांनी या गोशाळेवर अलीकडे गोमूत्र व शेणापासून अनेक सेंद्रिय शेती उपयुक्त घटक आणि समाज उपयुक्त सौंदर्यप्रसाधने व अन्य विविध घटक बनवायला सुरुवात केली असल्याने हळूहळू लोकांचा आणि शेतकऱ्यांचा वाढता कल पाहता आणि काळानुसार सेंद्रिय शेतीची किती गरज आहे. हे जाणून गोरक्षणासह उत्पादनाकडे वळण्याचा मानस ठेवला.

कारण आज प्रत्येक घराच्या उंबऱ्यागणीस घरात दहा सदस्य असतील तर पैकी सहा सदस्यांना मधुमेह, तर एकास तरी कॅन्सर सारखा गंभीर आजार असल्याने जवळपास ७०-८० टक्के कुटुंब अगदी त्रस्त आहेत. अशा या सर्वच रासायनिक असलेल्या भस्मासुराचा युगात आपल्या गोशाळेच्या माध्यमातून आपले वरवटी गाव आणि भोवतालची चाळीस-पन्नास खेडे तरी आमच्या परिवाराच्या कष्टाने आमच्या गोशाळेच्या माध्यमातून रासायनिक शेतीला बगल देत सेंद्रिय शेतीकडे वळून भोवतालच्या गावांमध्ये अगदी उच्च दर्जाची सेंद्रिय शेती होऊन बाजारपेठेत अगदी पौष्टिक गुणधर्मांसह धान्य-भाजीपाला व अन्य शेतीमालाचे घटक पोहोचावेत. शिवाय त्याच सोबत महिला-पुरुष यांना रोजच्या वापरामध्ये अत्यावश्यक असणारे साबण-



दंतमंजन-डोक्याचे तेल-कपडे-भांडे धुण्याचे साबण, चेहऱ्याला लावायच्या विविध क्रीम यासारखी अत्यावश्यक घटक उत्पादित करून ते सर्वांपर्यंत पोहोचले पाहिजेत. कारण आजमितीला बाजारपेठेत अत्यंत घातक रसायन बनवून विकली जात असून सरळसरळ मानवाच्या जीवनासोबत खेळले जात आहे. त्यामुळे घातक असणारी कॉस्मेटिक सौंदर्य प्रसाधने न वापरता हजारो वर्षांचा इतिहास असणारी शेणखत व गोमूत्रापासून बनणारी दर्जेदार आयुर्वेदिक प्रसाधने वापरात येऊन समाजाचे आरोग्य अगदी व्यवस्थित राहावे. म्हणून अलीकडच्या चार-पाच वर्षात मुंडे कुटुंब मोठे प्रयत्नशील असून त्यांना या प्रवासात बऱ्यापैकी यशही आले आहे.

अद्यापही शासनाची काडीमात्र मदत न घेता स्वयंप्रेरणेने आणि समाजातील सढळ हाताने मदत करणारी मंडळी व गो-भक्त-गो-रक्षक आणि गो-मातेवर नितांत प्रेम करणारी जी काय मंडळी आहे. त्यांच्या माध्यमातून मिळणाऱ्या तुटपुंजा मदतीवर गोशाळा चालवण्याच्या मुंडे परिवाराच्या प्रवासाचे आता एक दशक संपले असून योगायोगाने ज्या राजकीय-सामाजिक दैवताच्या नावे ही गो-शाळा उभी केली आहे. त्यांच्याच ज्येष्ठ कन्या पंकजा मुंडे या आजमीतिला राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री असल्याने त्यांच्या माध्यमातून तरी सध्या घडीला आंबेजोगाई व परळी तालुक्यातील रासायनिक शेती पूर्णतः सेंद्रिय व्हावी म्हणून आणि या दोन तालुक्यातील तथा मतदारसंघातील लोकांना अगदी दर्जेदार जीवन उपयुक्त घटक आणि अगदी शुद्ध सौंदर्यप्रसाधने मिळावेत आणि मग त्यासाठी व्हावा लागणाऱ्या प्रकल्पांसाठी राज्य आणि केंद्र शासन यांच्या माध्यमातून थोडाफार निधी मिळून या ठिकाणी निरनिराळे प्रोजेक्ट उभा करता यावेत. यासाठी नेहमीच कष्टाळू-परिश्रमी लोकांच्या संपर्कात राहून त्यांना कशी मदत करता येईल. ही भावना ठेवणारे पंकजा मुंडे यांचे ओ.एस.डी तथा पशुसंवर्धन सह-आयुक्त डॉ.विजय कराड यांनी हा योग गाठून पंकजा-प्रीतम मुंडे या दोन्ही भगिनींना विनंती करून या गो-शाळेची भेट घडवून आणली. आणि मग या भेटीच्या माध्यमातून गोशाळेचा एकंदरीत प्रवास जाणून घेत आपले ओ.एस.डी. आणि पी.एस. यांना या गोशाळेस भरभरून मदत करण्याच्या सूचना मंत्री पंकजा मुंडे यांनी दिल्या.

श्रीमती.प्रज्ञाताई मुंडे यांच्या येण्याने मात्र...., खुदा से मांगी ती खाली पंकजा-प्रीतम ताई की भेट मगर ईश्वर ने मेरा काम देख कर मेरे गो-शाळा पे भेजा लोकनेते स्व-गोपीनाथरावजी मुंडे साहाब को थेट....!
--ऍड.अशोक मुंडे

यावेळी मंत्री पंकजा मुंडे आणि मा.खा.डॉ.प्रीतम मुंडे यांचे मुंडे परिवाराच्या वतीने औक्षण करण्यात आले. औक्षणानंतर गो-शाळेची माहिती जाणून घेत गो-काष्टासह दोन-चार महत्वपूर्ण घटकांचे रिबीन काटून उद्घाटन करण्यात आले. यावेळी योगायोगाने दोन्ही भगिनींसोबत त्यांच्या आई तथा लोकनेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे यांच्या धर्मपत्नी श्रीमती. प्रज्ञाताई मुंडे उपस्थित असल्याचा मुंडे कुटुंबास आणि गावकऱ्यांसह उपस्थित मंडळी फारच आनंद झाला. या आनंदा मागे कारण ही तितकेच विशेष आहे.कारण लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे यांच्या निधनानंतर सुरू झालेल्या या गोशाळेत साहेबांचे पाय लागणे कधीच शक्य नव्हते. परंतु अपेक्षा पंकजा-प्रीतम मुंडे ताईंची असताना त्यांच्यासह आज प्रज्ञाताई आल्याने साक्षात मुंडे साहेबच गो-शाळेवर आल्याची भावना झाल्याची डोळ्यांच्या पाणावलेल्या कडांना वाट करून देत यावेळी ऍड.अशोक मुंडे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना आपली भावना व्यक्त केली.



## आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली आणि नगराध्यक्षा प्रेमलतातार्इ पारवे यांच्या मार्गदर्शनाखाली

## जिल्हा परिषद ते राजुरी वेस आणि स्टेडियम रोडच्या कामाला सुरुवात

बीड । प्रतिनिधी

आ.विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली आणि नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्षांची टीम पुर्ण ताकदीने विकास कामाला लागली आहे. शहरातील विविध रस्त्यांच्या कामांना सुरूवात करण्यात येत आहे. आज सकाळी शहरातील जिल्हा परिषद-नगर पालिका-राजुरीवेस पर्यंत आणि जालना रोड ते पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर पुतळा ते सुभाष रोड (जिल्हा स्टेडियम परिसर) या दोन्ही महत्वाच्या रस्त्याच्या कामांना आज प्रत्यक्ष सुरूवात करण्यात आली.

यावेळी नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, गटनेते फारूख पटेल, जेष्ठ नगरसेवक सय्यद सादेकुजमा, अमर नाईकवाडे, नगरसेवक जैतुल्ला खान, अश्फाक इनामदार, शेख बिलाल, जकी इनामदार, शेख बब्बु, रामदास सरवदे यांच्यासह भागवत तावरे, बरकत पठाण, शेख एकबालभाई, शेरखान व पत्रकार बांधव उपस्थित होते. दरम्यान या दोन्ही रस्ता कामांना आज सुरूवात करण्यात आली असली तरी इतरही रस्त्यांच्या कामांना टप्या-टप्याने सुरूवात करण्यात येणार आहे. या दोन्ही रस्त्यांचे काम क्वालिटीचे करण्याच्या सुचना नगराध्यक्षांच्या टीमने संबंधितांना दिल्या.

# मुजोर रिक्षाचालकांवर वाहतूक शाखा व आरटीओची संयुक्त कारवाई

## नियमांचे उल्लंघन करणार्या वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई ; वाहनचालकांमध्ये खळबळ

बीड । प्रतिनिधी

प्रभारी पोलीस अधिक्षक चेतना तिडके, अप्पर पोलिस अधिक्षक समीर शेख यांच्या आदेशाने तसेच जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील आणि उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) चे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी बालाजी धन्वे यांच्या सांगण्यावरुन मोटार वाहन निरीक्षक जगदीश चौधरी, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक आश्विनी मोरे, महेश भोसले, चालक दराडे यांच्या संयुक्त विद्यमाने काल दि.५ जून २०२६ शुक्रवार रोजी बीड शहरासह परिसरात अवैधरित्या नियमांचे उल्लंघन करणार्या आणि प्रवासी वाहतूक करणार्या ऑटोरिक्षा आणि ॲपेरिक्षा आणि इतर वाहने अशा एकूण ४० वाहनांविरोधात कार्यवाही करण्यात आली असून २५ रिक्षाचालकांवर ९५ हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे यामुळे अवैध



वाहनचालकांमध्ये खळबळ उडाली आहे या कारवाईमध्ये जिल्हा वाहतुक शाखेचे कर्मचारी पोलीस हवालदार सखाराम घोलप, मनोज जायभाये, अजिनाथ मुंडे, फुलचंद जाधव, शेषनारायण गाडे, पोलिस अंमलदार संतोष मोरे, शुभम सानप, जिल्हा वाहतुक शाखेचे चालक दत्ता कदम व नारायण वाघमारे यांनी सहभाग नोंदवून कर्तव्य बजावले.

वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवून परवान्याविना प्रवासी वाहतूक करणे, वाहनांची आवश्यक कागदपत्रे नसणे, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक करणे तसेच फिटनेस व विमा नियमांचे उल्लंघन करणार्या वाहनांची तपासणी करण्यात आली. तसेच इन्शुरन्स नसणे, पीयुसी नसणे, परवाना संपलेले, विना परवाना, नो पार्किंग या सदराखाली मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली.

शहरातील प्रमुख चौक असलेले मुख्य ठिकाण छत्रपती शिवाजी महाराज चौक, अण्णाभाऊ साठे चौक, बसस्थानक परिसर तसेच गर्दीच्या ठिकाणी ही संयुक्त मोहीम राबविण्यात आली. यावेळी वाहतूक शाखेचे अधिकारी, कर्मचारी तसेच आरटीओ विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि वाहतूक व्यवस्थेत शिस्त निर्माण करण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचे जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी सांगितले.

आम्ही शपथ घेतो की वाहतुकीचे नियम पाळूयात तसेच नागरिकांना कुठलाही त्रास होणार नाही याची काळजी घेवू अशी पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी वाहनधारकांना शपथ दिली.वाहनचालकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवून वाहतूक नियमांचे पालन करावे, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा जिल्हा वाहतूक शाखेने दिला आहे. या कारवाईमुळे अवैध प्रवासी वाहतुकीला आळा बसण्यास मदत होणार असून वाहनांचे नियम पाळणार्या नागरिकांतून या मोहिमेचे स्वागत केले आहे.

## छ.संभाजीनगर अप्पावाडी येथे जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या

अमृतहस्ते संत शिरोमणी श्रीमन्मथ स्वामी व श्री सद्गुरू पंचाक्षरशिवाचार्य दर्शनार्थ मुर्तींचे अनावरण थाटात संपन्न

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

येथील वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने श्रीमन्मथधाम ध्यान मंदिर श्री पंचाक्षर तपोवन संस्थान येथे दि ३ जून २०२६ रोज बुधवारी ज्येष्ठ अधिक मास निमित्त श्री श्री श्री १००८ जगद्गुरु डॉ चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृतहस्ते संत शिरोमणी श्रीमन्मथ स्वामी व श्री सद्गुरू पंचाक्षरशिवाचार्य दर्शनार्थ मुर्तींचे अनावरण तसेच ग्रंथदिंडी मिरवणुक भव्यदिव्य स्वरूपात संपन्न झाली.



यावेळी आयोजित धर्मसभेत उपस्थित समाजबांधवांना जगद्गुरू श्रीमद् काशी महास्वामीजीनी आपल्या धर्मोपदेशात् अधिक मासातिल कर्तव्य कर्म, जप,तप, दान, उपासना पद्दतीवर फार सुंदर विवेचन केले. डॉ. विरूपाक्ष शिवाचार्य महाराजांनी श्रीक्षेत्र मन्मथधाम जंगममठ संस्थानची नुकतीच २३ वर्षपूर्ती करून पुन लगेच ग्रामीण भागात ही धर्मानुष्टान करण्या करिता अप्पावाडी येथे आपल्या गुरू महातपस्वी ष ब्र१०८ श्रीसद्गुरू पंचाक्षर शिवाचार्यांचे व संतशिरोमणी मन्मथ स्वामींच्या येणारे भक्तांसाठी आज रोजी अनावरण करण्यात आले. खूप वेळापासून सर्व भक्तगण दर्शनासाठी वाट पहात होते हे जाणुनच आम्ही दूर जाणे असून ही येथे आलो. असे बोलत पुढे नगर, नाशिकला जाणे असल्याने परत एक वेळ सर्वांना मंगलाशिर्वाद प्रदान केले.

या वेळी संपूर्ण अप्पावाडी, शरणापूर, दौलताबाद, आब्दीमंडी, बजाजनगर, जालना शहरातील व ग्रामीण भागातील समस्त समाज बांधव उपस्थित होते. प्रामुख्याने सर्व श्री लक्ष्मण आप्पा लिंभारे, श्रीकांतअप्पा सदावर्ते, महालिंगअप्पा सदावर्ते (सरपंच) , नारायणअप्पा लिंबारे , सुरेशअप्पा चुनुके ,कांतेश्वरअप्पा लिंबारे,ईस्वरअप्पा लिंबारे, मधुकरअप्पा लिंबारे ,रत्नाकरअप्पा लिंबारे, देविदासअप्पा लिंबारे, विनोद अप्पा लिंबारे,रामअप्पा लिंबारे, निलेशअप्पा लिंबारे,सचिनअप्पा लिंबारे,जगदीशअप्पा लिंबारे, महेशअप्पा व्यवहारे,कबाडेअप्पा,व महिला मंडळींची संख्याही जास्त होती.



बीड- शिवराज्याभिषेक दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करतांना नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, गटनेते फारूख पटेल, नगरसेवक जैतुल्लाखान, भागवत तावरे, लक्ष्मण नरनाळे, गोपाळ धांडे, झुंजार धांडे, सुरेश शेटे, विकास जोगदंड, नगरसेवक मनोज गोडसे, महेश धांडे, शेख बिलाल, जकी सौदागर, शेख एकबाल, शेख बब्बु, सय्यद जुल्फेखार अली, शेख मेहराज, नाहेद बागवान आदी.

## एस.के.एच. वैद्यकीय महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

येथील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकिय महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला.जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणार्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी पर्यावरणाचे महत्त्व, वृक्षसंवर्धनाची गरज आणि शाश्वत विकासासाठी प्रत्येकाने योगदान देण्याची आवश्यकता यावर मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी डॉ.अरूण भस्मे, प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल, उपप्राचार्य डॉ.गणेश पांगारकर, वैभव शहापुरे आदिंनी पर्यावरण रक्षणासाठी वृक्षारोपनासह पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारणाचे आवाहन केले. यावेळी मनोज वाघिरे आपल्या मनोगतात म्हणाले की, पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने पुढाकार घेण्याचे आवाहन केले. यावेळी प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजय पुणेकर यांनी केले.



## आध्या डायग्नोस्टिक सेंटरतर्फे क्षयरोग, दमा व न्यूमोनिया आजारांवर मोफत वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन

मुखेड । प्रतिनिधी

मुखेड येथील आध्या डायग्नोस्टिक सेंटरच्या ६ व्या वर्धापन दिनानिमित्त आमच्या सेवेस रुग्णाचे मिळणारे उदंड प्रतिसाद पाहून रुग्णाच्या आरोग्याचे हित जोपासण्यासाठी विशेष उपक्रम म्हणून क्षयरोग (टीबी), दमा, न्यूमोनिया व श्वसनविकारांवरील मोफत वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर मंगळवार दि. ९ जून २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत

आध्या डायग्नोस्टिक सेंटरचे संचालक डॉ. श्रीहरी बुडगेमवार यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर घेण्यात येणार आहे. या शिबिरात हैदराबाद येथील प्रख्यात फुफ्फुसरोग तज्ज्ञ डॉ. मन्नेम उपेंद्र कुमार (चइइड, चऊ झींश्रोपेश्रेसळीीं) यांची उपस्थिती राहणार असून रुग्णांची तपासणी व मार्गदर्शन केले जाणार आहे. शिबिरामध्ये एलर्जी दमा, दीर्घकालीन खोकला, छातीत दुखणे, श्वास घेण्यास त्रास, झोपेत घोरणे, फुफ्फुसांमध्ये पाणी भरणे, श्वसननलिकांचे आजार, टीबी, वारंवार सर्दी-खोकला तसेच धूम्रपान, बीडी, सिगारेट व तंबाखूमुळे होणाऱ्या आजारांचे निदान व उपचाराबाबत सल्ला दिला जाणार आहे.विशेष म्हणजे शिबिरासाठी येणाऱ्या रुग्णांना औषधे, एक्स-रे व सीटी स्कॅनवर विशेष सवलत देण्यात येणार असून ईसीजी व मधुमेह तपासणी पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहे.नागरिकांनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक डॉ. श्रीहरी बुडगेमवार यांच्या वतीने करण्यात आले आहे. स्थळ : आध्या डायग्नोस्टिक सेंटर, बाराहाळी नाका मुखेड.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांच्या २६ व्या पुण्यतिथीनिमित्त आष्टीत भव्य अखंड हरिनाम सप्ताह

## भागवताचार्य ह.भ.प. भागवत महाराज बादाडे यांची श्रीमद् भागवत कथा


आष्टी - (एस.राजेंद्र लाड) वारकरी संप्रदायातील महान संत, अध्यात्म, भक्ती आणि समाजप्रबोधनाचा अखंड दीप प्रज्वलित करणारे परमपूज्य ब्रह्मलीन ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांच्या २६ व्या पुण्यतिथीनिमित्त आष्टी शहरात भव्य धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. माऊली सेवा मंडळाच्या वतीने दि. २३ जून ते ३० जून २०२६ या कालावधीत माऊली नगर येथील माऊली मंदिर परिसरात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, अखंड हरिनाम सप्ताह, संगीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ, हरिकीर्तन, भजन, नामसंकीर्तन आणि महाप्रसाद अशा विविध धार्मिक कार्यक्रमांची भक्तिमय पर्वणी आयोजित करण्यात आली आहे.

वीसाव्या शतकातील संतश्रेष्ठ म्हणून ओळख असलेल्या ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांनी आपल्या अध्यात्मिक कार्यातून हजारो वारकऱ्यांना भक्तीमार्गाची प्रेरणा दिली. त्यांच्या पुण्यस्मरणार्थ आयोजित या सप्ताह सोहळ्याला यंदा विशेष महत्त्व प्राप्त झाले असून संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.

या सप्ताहाचे उद्घाटन ह.भ.प. आदिनाथ महाराज दानवे यांच्या हस्ते कलशपूजनाने होणार आहे. विनापूजन ह.भ.प. रामदास महाराज डोरले, ग्रंथपूजन ह.भ.प. श्रीहरी पुरी महाराज यांच्या हस्ते संपन्न होईल. तर दीपप्रज्वलन ह.भ.प. ब्रह्मचैतन्य तावरे महाराज, ह.भ.प. मंगेशदेवा जोशी, ह.भ.प. धोंडीबापू वांढरे, ह.भ.प. अशोक डोके सर, ह.भ.प. घनश्याम खलासे महाराज, ह.भ.प. गोविंद पवार सर आणि ह.भ.प. सोनाजी बनकर सर यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे.

सप्ताहातील मुख्य आकर्षण म्हणून ज्ञानेश्वरी मुखोद्गत असलेले रामायणाचार्य व भागवताचार्य ह.भ.प. भागवत महाराज बादाडे यांची संगीत सुश्राव्य श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ आयोजित करण्यात आली आहे. दि. २३ जून ते २९ जून दरम्यान दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत होणाऱ्या या कथामालेत भागवत धर्म, संत साहित्य, भक्ती, वैराग्य आणि जीवनमूल्यांचा अमृतवर्षाव होणार आहे.

सप्ताहात विष्णुसहस्रनाम, गीतापाठ आणि ज्ञानेश्वरी पारायणाचे मार्गदर्शन ह.भ.प. निवृत्ती महाराज बोडखे करणार आहेत. ज्ञानेश्वरी व्यासपीठाचे संचालन ज्ञानेश्वरी कंठस्थकार ह.भ.प. बालाजी महाराज कवठेकर करणार असून मृदंगाचार्य ह.भ.प. ओम महाराज नन्नवरे, ह.भ.प. औदुंबर आवारे यांची साथ लाभणार आहे. तसेच गायनाचार्य ह.भ.प. अनिल महाराज गरूड, ह.भ.प. बबन महाराज बळे, ह.भ.प. देविदास महाराज बरडे, ह.भ.प. रविंद्र महाराज तवले, ह.भ.प. दत्ता महाराज खाडे, ह.भ.प. मुकेश महाराज तळेकर आणि ह.भ.प. ब्रह्मचैतन्य महाराज तावरे यांचे भक्तिगायन होणार आहे.



काकडा भजनासाठी ह.भ.प. रावसाहेब महाराज आडसरे, ह.भ.प. गोपीनाथ महाराज पोकळे, ह.भ.प. भानुदास पारस कोकणे, ह.भ.प. मच्छिंद्र महाराज करडुळे, ह.भ.प. नानासाहेब महाराज तवले, ह.भ.प. शामराव झांबरे महाराज आणि ह.भ.प. बबन महाराज जगताप यांची सेवा लाभणार आहे. हार्मोनियमवर ह.भ.प. उत्तम महाराज पोकळे व ह.भ.प. किसन महाराज जगताप साथसंगत करणार आहेत.

सप्ताह काळात दररोज पहाटे काकडा भजन, विष्णुसहस्रनाम, गीतापाठ, पसायदान, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथाभजन, दुपारी संगीत श्रीमद् भागवत कथा, सायंकाळी हरिपाठ आणि रात्री हरिकीर्तनानंतर महाप्रसाद अशा कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. त्यामुळे संपूर्ण माऊली नगर परिसर सात दिवस अखंड हरिनामाच्या गजराने दुमदुमून जाणार आहे.

कीर्तन सेवेसाठीही नामवंत कीर्तनकारांची मांदियाळी उपस्थित राहणार आहे. मंगळवार दि. २३ जून रोजी नामधारक ह.भ.प. संत आसाराम महाराज केळसांगवीकर यांचे नामसंकीर्तन होईल. बुधवार दि. २४ जून रोजी ह.भ.प. पांडुरंग महाराज मुंडे, गुरुवार दि. २५ जून रोजी ह.भ.प. समाधान माय महाराज, शुक्रवार दि. २६ जून रोजी ह.भ.प. डॉ. जलाल महाराज सय्यद, शनिवार दि. २७ जून रोजी भागवताचार्य ह.भ.प. भागवत महाराज बादाडे, रविवार दि. २८ जून रोजी वैराग्यमूर्ती ह.भ.प. रामकृष्ण रंधवेबापू महाराज यांची कीर्तनसेवा होणार आहे.सोमवार दि. २९ जून हा पुण्यतिथी सोहळ्याचा मुख्य दिवस असणार आहे. सकाळी १० ते १२ या वेळेत हिंदूभूषण ह.भ.प. सुनीताताई आंधळे महाराज (आळंदी) यांचे पुण्यकालाचे कीर्तन होईल. तर रात्री ७ ते ९ या वेळेत अखिल भारतीय वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले यांचे विशेष कीर्तन संपन्न होणार आहे.

याच दिवशी श्रीमद् भागवत कथा विश्राम पावल्यानंतर ज्ञानेश्वरी, अभंगगाथा, श्रीमद् भागवत ग्रंथ आणि संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर महाराज यांच्या प्रतिमेची टाळ-मृदंग, ढोल-लेझीम आणि बँड पथकाच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत हजारो भाविक सहभागी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मंगळवार दि. ३० जून रोजी सप्ताहाची सांगता होणार असून सकाळी ८ ते १० या वेळेत संगीत विशारद ह.भ.प. आदिनाथ औटे सर व माऊली सेवा भजनी मंडळ यांचे संगीत भजन होईल. त्यानंतर सकाळी १० ते १२ या वेळेत संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांचे उत्तराधिकारी तपोनिधी ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांचे काल्याचे कीर्तन संपन्न होईल. कीर्तनानंतर हजारो भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या पुण्यतिथी सोहळयास श्रीक्षेत्र तारकेश्वरगडाचे महंत शांतिब्रह्म आदिनाथ महाराज शास्त्री, आमदार सुरेश धस, माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी आमदार बाळासाहेब आजबे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजय गोल्हार, डॉ. शिवाजी राऊत, सतीशआबा शिंदे, आण्णासाहेब चौधरी, नगराध्यक्ष जिया बेग, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, अशोक मुळे, सरपंच सौ. शालन अशोक मुळे, उपसरपंच डॉ. जालिंदर वांढरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, लोकप्रतिनिधी, पत्रकार, वारकरी, भाविक आणि भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

या अखंड हरिनाम सप्ताहातून संत परंपरेचा वारसा, ज्ञानेश्वरीचे तत्त्वज्ञान, भागवत धर्माची शिकवण आणि समाजात भक्ती, सदाचार व मानवतेचे संस्कार रुजविण्याचे कार्य होणार असल्याने सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ज्ञानामृताचा लाभ घ्यावा, असे आवाहन माऊली सेवा मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# कर्तव्यदक्ष प्रशासन अधिकारी प्रा.डॉ.शिवदास विधाते यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

## शिस्त,निष्ठा आणि विकासदृष्टीचा प्रेरणादायी प्रवास

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शिक्षण क्षेत्रात अनेक व्यक्ती आपल्या ज्ञानाने ओळख निर्माण करतात, तर काही व्यक्तिमत्त्वे आपल्या कार्यतत्परतेने, शिस्तप्रियतेने आणि संस्थेप्रती असलेल्या निस्सीम समर्पणामुळे वेगळी छाप सोडतात. आष्टी येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ तसेच त्याची भगिनी संस्था किसान शिक्षण संस्थेचे कर्तव्यदक्ष प्रशासन अधिकारी प्रा. डॉ. शिवदास विधाते हे असेच एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या वाढदिवसानिमित्त शिक्षण, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील विविध मान्यवर, सहकारी, मित्रपरिवार तसेच विद्यार्थ्यांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

प्रा. डॉ. शिवदास विधाते यांनी आपल्या कार्यकाळात केवळ प्रशासन सांभाळण्याचे काम केले नाही, तर संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी अविरत परिश्रम घेत एक आदर्श प्रशासक म्हणून स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. शिस्त, पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि संस्थेप्रती असलेली निष्ठा या गुणांच्या बळावर त्यांनी संस्थेच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिले आहे.

मोठ्या शैक्षणिक संस्थेचे प्रशासन सांभाळणे हे अत्यंत जबाबदारीचे आणि आव्हानात्मक काम असते. अशा परिस्थितीत डॉ. विधाते यांनी आपल्या कौशल्यपूर्ण नियोजनातून आणि दूरदृष्टीतून संस्थेच्या कामकाजात गतिमानता निर्माण केली. संस्थेचे हित आणि विद्यार्थ्यांचे भविष्य यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी घेतलेले निर्णय आज संस्थेच्या प्रगतीचे महत्त्वपूर्ण आधारस्तंभ ठरले आहेत.



त्यांची कार्यशैली ही केवळ कार्यालयीन चौकटीत मर्यादित नसून संस्थेतील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन पुढे जाण्याची आहे. त्यामुळेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक यांच्यात त्यांनी विश्वासाचे नाते निर्माण केले आहे. समस्यांचे तात्काळ निराकरण, सकारात्मक दृष्टीकोन आणि सर्वांना आपलेसे करणारा स्वभाव यामुळे ते संस्थेतील प्रत्येकासाठी आधारवड ठरले आहेत.

प्रा. डॉ. विधाते यांची आणखी एक विशेष ओळख म्हणजे त्यांचा व्यापक जनसंपर्क आणि सामाजिक बांधिलकी. शिक्षण क्षेत्रातील विविध उपक्रम, सामाजिक कार्यक्रम तसेच विकासाभिमुख योजनांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. समाजातील विविध घटकांना एकत्र आणून शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनासाठी काम करण्याची त्यांची भूमिका नेहमीच उल्लेखनीय राहिली आहे. माजी आमदार तथा शिक्षण महर्षी भीमराव धोंडे साहेब तसेच युवा नेते अजयदादा धोंडे यांचे विश्वासू सहकारी म्हणूनही त्यांची ओळख आहे. धोंडे कुटुंबाच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासाच्या संकल्पनांना प्रत्यक्षात यशस्वीपणे राबविण्यासाठी त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. त्यांच्या प्रशासकीय अनुभवाचा आणि नियोजनक्षमतेचा संस्थेला मोठा लाभ झाला आहे.

सहकाऱ्यांशी जिव्हाळ्याचे संबंध, विद्यार्थ्यांबद्दलची आत्मीयता आणि योग्य वेळी दिलेले मार्गदर्शन यामुळे ते अनेकांच्या जीवनातील प्रेरणास्थान बनले आहेत. अडचणीच्या काळात धीर देणारे, यशाच्या क्षणी प्रोत्साहन देणारे आणि प्रत्येकाला पुढे जाण्यासाठी प्रेरित करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे आदराने पाहिले जाते.

आपल्या अभ्यासू वृत्ती, कार्यक्षम नेतृत्व, शिस्तप्रिय स्वभाव आणि विकासाभिमुख दृष्टिकोनामुळे प्रा. डॉ. शिवदास विधाते यांनी शिक्षण क्षेत्रात स्वतःचा वेगळा ठसा उमटविला आहे. त्यांच्या कार्याचा लाभ हजारो विद्यार्थी, शिक्षक आणि समाजघटकांना होत असून त्यांच्या योगदानाची दखल सर्व स्तरांतून घेतली जात आहे.

त्यांच्या वाढदिवसानिमित्त मित्रपरिवार, सहकारी, शिक्षणप्रेमी नागरिक आणि शुभेच्छुकांनी त्यांना निरोगी, आनंदी, यशस्वी व दीर्घायुष्य लाभावे, तसेच त्यांच्या हातून शिक्षण आणि समाजसेवेचे कार्य अधिक व्यापक स्वरूपात घडत राहावे, अशा मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

कार्याचा ध्यास, शिस्तीचा बाणा आणि संस्थाविकासाची अखंड तळमळ या त्रिसूत्रीवर यशस्वी वाटचाल करणारे प्रा. डॉ. शिवदास विधाते यांचे व्यक्तिमत्त्व आजच्या युवा पिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना दैनिक समर्थ राजयोग परिवाराकडून हार्दिक शुभेच्छा.

# स्वामी विवेकानंद विद्यालय बावीच्या १४ विद्यार्थ्यांची इस्त्रो सफर यशस्वी

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) ग्रामीण व डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता दडलेली असते. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण अध्यापन आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण मिळाल्यास हे विद्यार्थी राज्य व राष्ट्रीय स्तरावरही आपली छाप पाडू शकतात, याचे उत्तम उदाहरण म्हणजे बावी येथील स्वामी विवेकानंद विद्यालय होय. अत्यंत प्रतिकूल भौगोलिक परिस्थितीतही विद्यालयाने शैक्षणिक गुणवत्ता टिकवून ठेवत विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षेच्या माध्यमातून इस्त्रो सफरीसाठी पात्र ठरत राज्यस्तरावर विशेष कामगिरी केली आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विद्यालयाच्या तब्बल १२ विद्यार्थ्यांची इस्त्रो सफरीसाठी निवड झाली होती. त्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विद्यालयाचे विद्यार्थी कु. राजवीर बद्रिनाथ तरटे आणि कु. अनुष्का श्रीराम गर्जे यांनी राज्यात उत्कृष्ट यश संपादन करून इस्त्रो भेटीसाठी पात्रता मिळवली आहे. त्यामुळे आतापर्यंत विद्यालयातील एकूण १४ विद्यार्थ्यांनी इस्त्रो सफर यशस्वीपणे पूर्ण केली असून ग्रामीण भागासाठी ही अत्यंत अभिमानास्पद बाब मानली जात आहे.




## ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांची इस्त्रोपर्यंत झेप

विद्यालयाने केवळ इस्त्रो सफरीपुरतेच मर्यादित यश मिळवले नसून नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेतही उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील ४ विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालयासाठी निवड झाली असून ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची दिशा देण्याचे काम विद्यालय सातत्याने करीत आहे.

शिष्यवृत्ती परीक्षांमध्येही विद्यालयाची कामगिरी लक्षणीय ठरली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या एकाच वर्षात विद्यालयाचे तब्बल ८० विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र ठरले आहेत. गेल्या ५ वर्षांत एकूण १२५ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळविण्याचा मान पटकावला आहे.

याशिवाय विविध राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यालयातील २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. ही कामगिरी ग्रामीण भागातील शैक्षणिक प्रगतीचे प्रेरणादायी उदाहरण मानली जात आहे.

विद्यालयातील शिक्षकवृंद विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असून स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय प्रवेश, प्रज्ञाशोध परीक्षा तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांची गुणवत्ता विकसित केली जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढत असून राज्यस्तरीय यशाची परंपरा निर्माण होत आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्तबद्ध वातावरण, अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थीकेंद्री अध्यापन पद्धती यामुळे स्वामी विवेकानंद विद्यालय बावी हे ग्रामीण भागातील शिक्षणाचे विश्वासार्ह केंद्र म्हणून उदयास आले आहे. याच विश्वासामुळे विद्यालयाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी दरवर्षी पालक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

विद्यालय व्यवस्थापन, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या संयुक्त प्रयत्नांतून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने काम सुरू असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील संधी उपलब्ध करून देण्याचे कार्य विद्यालय प्रभावीपणे पार पाडत आहे. विद्यालयाच्या या यशस्वी वाटचालीमुळे परिसरातील पालकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून भविष्यातही अशाच प्रकारे गुणवंत विद्यार्थी घडविण्याचा निर्धार विद्यालयाने व्यक्त केला आहे.ग्रामीण व डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता दडलेली असते. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण अध्यापन आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण मिळाल्यास हे विद्यार्थी राज्य व राष्ट्रीय स्तरावरही आपली छाप पाडू शकतात, याचे उत्तम उदाहरण म्हणजे बावी येथील स्वामी विवेकानंद विद्यालय होय.

# शिवराज्याभिषेक सोहळ्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचा अभिषेक करण्याचा मान मिळाल्याने उत्तम बोडखे भावुक

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) महाराष्ट्राचे आराध्य दैवत, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पवित्र शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सोहळ्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला अभिषेक करण्याचा मान लाभल्याने दै. झुंजारनेताचे उपसंपादक तथा ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांनी तीव्र भावनिक भावना व्यक्त केल्या आहेत. या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी क्षणाचे वर्णन करताना त्यांनी हा सन्मान आपल्या आयुष्यातील सर्वात अविस्मरणीय आणि भारावून टाकणारा क्षण असल्याचे सांगितले.



शिवराज्याभिषेक दिनानिमित्त परिसरातील शिवप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिकांच्या उपस्थितीत अत्यंत भक्तीमय वातावरणात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचा व मूर्तीचा अभिषेक करण्यात आला. यावेळी उत्तम बोडखे यांना प्रत्यक्ष अभिषेक करण्याचा मान मिळाला. या प्रसंगी त्यांनी महाराजांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करत स्वराज्याच्या आदर्शांचा समाजाने अंगीकार करण्याचे आवाहन केले.

आपल्या भावना व्यक्त करताना उत्तम बोडखे म्हणाले की, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पवित्र शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त आज एक अत्यंत भाग्याचा क्षण अनुभवायला मिळाला. येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात महाराजांच्या मूर्तीला अभिषेक करण्याची सुवर्णसंधी लाभली. हा सन्मान माझ्या आयुष्यातील सर्वात अविस्मरणीय आणि मनाला भारावून टाकणारा क्षण आहे. छत्रपतींच्या कार्याचा, त्यागाचा आणि स्वराज्यनिर्मितीच्या प्रेरणेचा विचार केला की मन अभिमानाने भरून येते. या पवित्र क्षणाचा साक्षीदार होणे हे माझ्यासाठी मोठे भाग्य आहे.

यावेळी त्यांनी सर्व शिवप्रेमी, आयोजक आणि उपस्थित नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले. शिवराज्याभिषेक हा केवळ ऐतिहासिक दिवस नसून स्वाभिमान, शौर्य, न्याय, धर्मनिरपेक्षता आणि जनकल्याणकारी राज्यकारभाराचे प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेले सुशासन, राष्ट्रप्रेम आणि लोककल्याणाचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान शिवाजी महाराजांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी, जय शिवाजी अशा घोषणांनी वातावरण शिवमय झाले होते. अनेक शिवभक्तांनी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच शिवचरित्रावर आधारित विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेल्या उत्तम बोडखे यांना मिळालेला हा सन्मान त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर कार्याची पावती मानला जात आहे. शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने मिळालेल्या या मानामुळे त्यांनी व्यक्त केलेल्या भावना सोशल मीडियावरही मोठ्या प्रमाणात चर्चेचा विषय ठरत असून अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जपत समाजहिताचे कार्य करण्याची प्रेरणा या सोहळ्यातून मिळाल्याची भावना व्यक्त करत उत्तम बोडखे यांनी शेवटी छत्रपतींच्या चरणी विनम्र अभिवादन केले आणि छत्रपती शिवाजी महाराज की जय! असा जयघोष करून आपल्या भावना व्यक्त केल्या.



आष्टी - (एस.राजेंद्र लाड) महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासातील सुवर्णक्षण मानल्या जाणाऱ्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आष्टी तालुक्यातील जामगाव येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करून हा दिवस मोठ्या उत्साहात, भक्तिभावाने आणि अभिमानाने साजरा करण्यात आला. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात आमदार सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीस दुग्धाभिषेक करण्यात आला. यावेळी शिवभक्त, ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेरी बु.येथे भव्य श्री ज्ञानेश्वरी पारायण व श्रीमद्भागवत कथा सप्ताहाचे आयोजन

## अधिक मासानिमित्त भक्ती,ज्ञान आणि नामस्मरणाचा महोत्सव

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील शेरी बु. येथे अधिक मास अर्थात धोंड्याचा महिना या पवित्र कालखंडाचे औचित्य साधून भव्य श्री ज्ञानेश्वरी पारायण व श्रीमद्भागवत कथा सप्ताह या धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दि. ७ जून २०२६ ते रविवार दि. १४ जून २०२६ या कालावधीत हा सप्ताह संपन्न होणार असून, संपूर्ण गाव भक्तिरसाने न्हाऊन निघणार आहे. या निमित्ताने आष्टी तालुक्यासह पंचक्रोशीतील भाविकांसाठी एक अनोखी आध्यात्मिक मेजवानी उपलब्ध होणार आहे.

महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा आणि वारकरी संप्रदायाच्या वैभवशाली संस्कृतीचा जागर करणारा हा सप्ताह गावातील धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाला नवी ऊर्जा देणारा ठरणार आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांनी दिलेल्या ज्ञानेश्वरीच्या अमृतवाणीसह श्रीमद्भागवताच्या भक्तिमय संदेशाचा लाभ भाविकांना या सप्ताहाच्या माध्यमातून मिळणार आहे.

या पवित्र सोहळ्यास वैराग्यमूर्ती ह.भ.प. रंगनाथ महाराज गावडे तसेच ह.भ.प. रघुनाथ महाराज धामणगावकर यांचे विशेष कृपाशीर्वाद लाभले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेला हा सप्ताह श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचा संगम ठरणार आहे.

सप्ताहातील प्रमुख आकर्षण म्हणून सुप्रसिद्ध प्रवचनकार ह.भ.प. नामदेव (शास्त्री) विधाते महाराज यांच्या अभ्यासपूर्ण, रसाळ आणि प्रभावी वाणीतून श्रीमद्भागवत कथेचे निरूपण होणार आहे. भागवत धर्म, भक्ती, वैराग्य, सदाचार आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम त्यांच्या प्रवचनातून भाविकांना अनुभवता येणार आहे. दररोज रात्री होणाऱ्या या कथेच्या श्रवणासाठी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



सप्ताहाची दैनंदिन रूपरेषा अत्यंत शिस्तबद्ध आणि धार्मिक वातावरण निर्माण करणारी ठेवण्यात आली आहे. पहाटे ४ ते ६ या वेळेत काकडा भजन व आरतीने दिवसाची सुरुवात होणार आहे. त्यानंतर सकाळी ७ ते ११ या वेळेत श्री ज्ञानेश्वरी पारायण पार पडेल. सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत गाथा भजनाचा कार्यक्रम होईल. सायंकाळी ५ ते ७ हरिपाठाचे आयोजन करण्यात आले असून, रात्री ७ ते १० या वेळेत श्रीमद्भागवत कथा रंगणार आहे. अशा प्रकारे दिवसभर नामस्मरण, पारायण, भजन आणि कथेचा अखंड भक्तिसोहळा अनुभवण्याची संधी भाविकांना मिळणार आहे.

या सप्ताहाला संगीताचीही विशेष साथ लाभणार आहे. गायनाचार्य ह.भ.प. दत्ता महाराज खाडे यांच्या सुमधुर गायनाने कथा आणि भजनांना भक्तिरसाची जोड मिळणार आहे. सिंथ वादक ह.भ.प. नेताजी महाराज रेखाडे आणि तबला विशारद ह.भ.प. बनसोडे सर यांच्या सुरेल साथीमुळे संपूर्ण सप्ताह अधिक आकर्षक आणि संस्मरणीय ठरणार आहे.

आठ दिवस चालणाऱ्या या अखंड ज्ञानयज्ञाची सांगता रविवार दि. १४ जून २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात होणार आहे. सांगता सोहळ्यानिमित्त सकाळी गावातून टाळ-मृदंगाच्या गजरात भव्य आणि नयनरम्य दिंडी प्रदक्षिणा काढण्यात येणार आहे. वारकरी परंपरेचे दर्शन घडविणारी ही दिंडी भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.

यानंतर सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. नामदेव (शास्त्री) विधाते महाराज यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. संत साहित्य, भक्ती आणि समाजप्रबोधनाचा संदेश देणारे हे कीर्तन भाविकांसाठी आध्यात्मिक आनंदाची पर्वणी ठरणार आहे. कीर्तनानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, मोठ्या संख्येने भाविक सहभागी होण्याची अपेक्षा आहे.

सध्या शेरी बु. गावात सप्ताहाच्या तयारीला वेग आला असून मंडप उभारणी, विद्युत रोषणाई, सजावट, बैठक व्यवस्था तसेच भाविकांच्या सोयीसुविधांची कामे अंतिम टप्प्यात पोहोचली आहेत. ग्रामस्थ, भजनी मंडळी आणि युवक वर्ग उत्साहाने या सोहळ्याच्या तयारीत सहभागी होत असून, गावात सर्वत्र भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

अधिक मासाच्या पावन पर्वावर आयोजित करण्यात आलेल्या या दुर्मिळ आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी आष्टी तालुका तसेच पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समस्त ग्रामस्थ व भजनी मंडळी, शेरी बु. यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# पंकजाताईंच्या आवाहनानुसार 'एक पेड माँ के नाम'च्या धर्तीवर बऱ्हाणपूर येथे 'एक झाड वडिलांच्या नावावर' मोहिमेचा भव्य शुभारंभ

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बऱ्हाणपूर येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने भव्य वृक्षलागवड कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न झाला. पंकजाताई मुंडे यांच्या आवाहनाला अभूतपूर्व प्रतिसाद देत भाजप जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे व भाजप बीड जिल्ह्याच्या वतीने या कौतुकास्पद उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

'एक पेड माँ के नाम' या राष्ट्रीय मोहिमेच्या धर्तीवर, भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा लोकनेत्या ना. पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे यांनी एक झाड वडिलांच्या नावावर (एक पेड बाप के नाम) लावून हा पर्यावरण उत्सव साजरा करण्याचे भावनिक आवाहन केले होते. त्यांच्या या आवाहनाला बऱ्हाणपूर ग्रामस्थांनी उत्स्फूर्त आणि अभूतपूर्व प्रतिसाद दिला.गावातील असंख्य नागरिकांनी एकत्र येत आपल्या वडिलांच्या सन्मानार्थ आणि पवित्र स्मृतीला उजाळा देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले. केवळ झाडे लावून न थांबता, लावलेल्या प्रत्येक रोपट्याचे कुटुंबातील सदस्याप्रमाणे संगोपन आणि जतन करण्याचा सामूहिक संकल्प या वेळी ग्रामस्थांनी केला.या पर्यावरणपूरक सोहळ्याला बऱ्हाणपूरचे सरपंच गोरख शिंदे, पोलीस पाटील रावसाहेब क्षीरसागर, ग्रामपंचायत सदस्य सुनील क्षीरसागर, दिनकर पाटील लांडे, महादेव शिंदे, ज्ञानेश्वर लांडे, राजेश क्षीरसागर, गोरख लांडे, भागवत शिंदे, संतोष क्षीरसागर, मोहन लांडे, विक्रम लांडे, कल्याण क्षीरसागर, अशोक जवादे, गणेश हजारी, दूर्वा भांगे, बाबासाहेब लांडे, गणेश चिरके आदींसह भाजपचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जिल्हाधिकारी कार्यालयात स्वच्छता मोहिम

## श्रमदानातून झाला परिसर स्वच्छ

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

दस्तुरखुद्द जिल्हाधिकारी आणि सर्वच वरिष्ठ अधिकारी आज सकाळी ७ वाजेपासून झाडू, फावडे, टोपल्या घेऊन मैदानात उतरले आणि अवघ्या दोन तासाच्या श्रमदानातून जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर हा हा म्हणता स्वच्छ झाला. यानिमित्ताने आज पुन्हा एकदा समुह शक्तीचा प्रत्यय जिल्हा प्रशासनाने आणून दिला.आज भल्या सकाळी ७ वा. जिल्हाधिकारी कार्यालयात कर्मचारी अधिकारी जमा होऊ लागले. आदल्या दिवशीच शनिवारी (दि.६) स्वच्छता मोहिम राबवून कार्यालय परिसर स्वच्छ करण्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यास प्रतिसाद देत सर्व अधिकारी - कर्मचारी सहभागी झाले. स्वतः जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. हातात झाडू घेऊन पुढे सरसावले. सर्व आवारात अधिकारी-कर्मचाऱ्यांनी गटागटाने भाग स्वच्छ करायला घेतला. वाढलेली झुडपे, गवत, जमा झालेला पाला पाचोळा, फेकलेल्या वस्तू, पाण्याच्या बाटल्या, निरुपयोगी साहित्य अशा एक ना अनेक जमा झालेल्या वस्तू काना-कोपऱ्यातून निघाल्या. हळू हळू प्रत्येक कोपऱ्यात कचऱ्याचे संकलन झाले. मग महापालिकेचे कचरा वाहतुक करणारी वाहने जमा झाली. एक दोन नव्हे तब्बल १२ वाहने भरुन कचरा जमा झाला. एकाच दिवसातल्या अवघ्या दोन तासाच्या श्रमदानाने चकाचक झालेले जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवार पाहून सारे अधिकारी- कर्मचारी स्वतःच आश्चर्य व्यक्त करीत होते. या मोहिमेत निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी (सामान्य शाखा) संगिता राठोड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सविता चौधर,उपजिल्हाधिकारी रुपेश सिंगारे, डॉ. निलेश अपार, एकनाथ बंगाळे, जिल्हा खनिकर्म अधिकारी दिनेश झांपले, जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक माहिती व तंत्रज्ञान विभाग शरद दिवेकर तसेच सर्व विभागप्रमुख, कर्मचारी आदी या मोहिमेत सहभागी झाले.

# विभागीय आयुक्तांकडून पाणीपुरवठा योजनेच्या प्रगतीचा आढावा

## १२ जूनपर्यंत वाढीव पाणीपुरवठ्यासाठी यंत्रणांना समन्वयाने काम करण्याचे निर्देश

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

महानगरातील नागरिकांना १२ जूनपर्यंत वाढीव पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कामांचा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज आढावा घेतला. नक्षत्रवाडी येथील ३९२ दशलक्ष लिटर क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्राला भेट देऊन त्यांनी विविध कामांची प्रत्यक्ष पाहणी केली तसेच संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून कामांच्या प्रगतीची माहिती जाणून घेतली.



छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजनेअंतर्गत सुरू असलेल्या विविध कामांचा आढावा नक्षत्रवाडी येथील केमिकल हॉलमध्ये आयोजित बैठकीत घेण्यात आला. यावेळी विभागीय आयुक्तांनी यापूर्वी विविध बैठका व पाहणीदरम्यान दिलेल्या सूचनांनुसार झालेल्या कामांचीही तपासणी केली. प्रकल्पातील विविध घटकांच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती, उर्वरित कामांची प्रगती आणि पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या प्रसंगी महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी, पोलीस आयुक्तालयाचे प्रतिनिधी, जिल्हा परिषदेचे अधिकारी, संबंधित विभागांचे अधिकारी-कर्मचारी तसेच कंत्राटदार कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.बैठकीत बोलताना विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी पाणीपुरवठा योजनेची उर्वरित कामे निर्धारित मुदतीत पूर्ण करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महानगरपालिका आणि संबंधित कंत्राटदारांनी परस्पर समन्वयाने काम करत आवश्यक निर्णय तत्काळ घ्यावेत, असे निर्देश त्यांनी दिले.

प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान कोणत्याही प्रकारच्या कायदेशीर किंवा प्रशासकीय अडचणी उद्भवल्यास संबंधित यंत्रणांनी कोणतीही कारवाई करण्यापूर्वी विभागीय आयुक्त कार्यालयाशी समन्वय साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मागील बैठकीत देण्यात आलेल्या सूचनांनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि महानगरपालिकेच्या संयुक्त प्रयत्नांतून गेल्या दोन दिवसांपासून अतिरिक्त २० एमएलडी पाणीपुरवठा सुरू करण्यात आला असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. यासोबतच १२ जूनपर्यंत टप्प्याटप्प्याने वाढीव आणि सुरळीत पाणीपुरवठा वितरण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी यावेळी सांगितले की, सध्या शहरातील अनेक भागांत सात ते आठ दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा केला जात आहे. नवीन योजनेतील कामे पूर्ण होत असताना या अंतरात टप्प्याटप्प्याने घट करण्यात येणार असून नागरिकांना अधिक नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध आहे.दरम्यान, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रकल्पाच्या कामांवर दररोज देखरेख ठेवली जात असून त्याबाबतचा प्रगती अहवाल नियमितपणे विभागीय आयुक्तांना सादर करण्यात येत आहे. बैठकीत या अहवालांचाही आढावा घेण्यात आला. कामांचा वेग वाढविणे, विविध विभागांतील समन्वय अधिक प्रभावी करणे आणि नागरिकांना दिलासा मिळेल अशा पद्धतीने प्रकल्प पूर्णत्वास नेणे यासंदर्भात विभागीय आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना विविध सूचना दिल्या.शहराच्या वाढत्या पाण्याच्या गरजा लक्षात घेता ही योजना अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, नियोजित वेळेत कामे पूर्ण झाल्यास छत्रपती संभाजीनगरकरांना अधिक नियमित, पुरेसा आणि शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे.

# राष्ट्रवादी किसान सभेच्या जिल्हाध्यक्षपदी नारायण पाटील पवार

## आंदोलन, संघटन व शेतकरी प्रश्नांवरील आक्रमक भूमिकेची दखल, तालुका- जिल्ह्यात अभिनंदनाचा वर्षाव

धर्माबाद / अशोक पडोळे

राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाशी संलग्न असलेल्या राष्ट्रवादी किसान सभेच्या नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्षपदी शेतकरी नेते नारायण पाटील पवार यांची निवड करण्यात आली आहे. शेतकरी प्रश्नांवर सातत्याने संघर्ष करणाऱ्या, आंदोलने उभारून प्रशासनाचे लक्ष वेधणाऱ्या नेतृत्वाला पक्षाने दिलेली ही महत्त्वाची जबाबदारी मानली जात असून, त्यांच्या निवडीमुळे जिल्ह्यातील शेतकरी संघटनांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ही निवड राष्ट्रवादी किसान सेभेचे प्रदेशाध्यक्ष अँड वसंतराव मनकर यांच्या आदेशानुसार करण्यात आली. मराठवाडा विभागीय अध्यक्ष श्री रामभाऊ हाडोळे यांनी नांदेड जिल्ह्यातील राष्ट्रवादी कॉँग्रेसचे नेते आमदार श्री प्रतापराव पाटील चिखलीकर तसेच नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष श्री शिवराज पाटील होटाळकर यांच्याशी सविस्तर चर्चा व विचारविनिमय करून नारायण पाटील पवार यांच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब केले.



नारायण पाटील पवार हे गेल्या अनेक वर्षांपासून तालुका व जिल्हास्तरावर शेतकरी प्रश्नांवर सातत्याने लढा देणारे नेतृत्व म्हणून परिचित आहेत. शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून त्यांनी विविध प्रश्नांवर आंदोलने उभी करत शासन व प्रशासनासमोर शेतकऱ्यांचा आवाज बुलंद केला आहे. विशेषतः पीक विमा, शेतीमालाचे प्रश्न, पोचमपाड बॅकवॉटर मावेजा, शेतकरी न्यायासाठीची आंदोलने यांसारख्या विषयांवर त्यांनी आक्रमक भूमिका घेतल्याने त्यांची ओळख संघर्षशील शेतकरी नेते म्हणून निर्माण झाली आहे.स्थानिक पातळीपासून मंत्रालयीन स्तरापर्यंत शेतकऱ्यांचे प्रश्न पोहोचवण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे. हजारो शेतकऱ्यांना संघटित करून विविध आंदोलनांतून प्रश्न मांडण्याची त्यांची कार्यशैली अनेकदा चर्चेचा विषय ठरली आहे. त्यामुळे त्यांच्या नियुक्तीमुळे राष्ट्रवादी किसान सभेच्या माध्यमातून जिल्ह्यातील शेतकरी प्रश्नांना अधिक ताकदीने आवाज मिळेल, अशी अपेक्षा कार्यकर्ते व शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

दरम्यान, शेतकरी हिताच्या प्रश्नांवर दिवस-रात्र काम करणाऱ्या नारायण पाटील पवार यांना पक्षाने दिलेली ही जबाबदारी संघटन विस्तारासाठी महत्त्वपूर्ण ठरेल, अशी भावना शेतकरी, कार्यकर्ते व समर्थकांमध्ये दिसून येत आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घेऊन त्यावर संघटनात्मक पातळीवर लढा उभारण्याची त्यांची क्षमता राष्ट्रवादी किसान सभेला नवसंजीवनी देईल, असा विश्वास अनेकांनी व्यक्त केला आहे.

राजकीय व सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेल्या नारायण पाटील पवार यांच्या नेतृत्वाखाली किसान सभा अधिक सक्षम, प्रभावी व व्यापक होईल आणि शेतकरी हिताच्या लढ्याला नवे बळ मिळेल, अशी चर्चाही तालुका व जिल्हास्तरावर सुरू आहे.

नारायण पाटील पवार यांच्या नेतृत्वाखालील गाजलेली आंदोलने

२०२४ : धर्माबाद येथे हजारो शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा

शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने हजारो शेतकऱ्यांना एकत्र आणत उपविभागीय अधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून विविध मागण्यांसाठी जोरदार लढा उभारण्यात आला.

२०२५ : कारेगाव फाटा येथे १७ दिवसांचे साखळी उपोषण

शेतकरी प्रश्न निकाली काढण्यासाठी झालेल्या आंदोलनात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत प्रशासनाचे लक्ष वेधले.

२०२५ : धर्माबाद येथे 'भिक मागो' अनोखे आंदोलन

शेतकरी समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अनोख्या पद्धतीने आंदोलन करून प्रश्न ऐरणीवर आणले.

२०२६ : पीक विम्यासाठी मंत्रालय गाठलेशेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम तातडीने मिळावी यासाठी मुंबई मंत्रालयात विविध मंत्री व अधिकाऱ्यांना निवेदने सादर करण्यात आली.२०२६ : धर्माबाद-नांदेड भव्य मोटारसायकल मोर्चापोचमपाड बॅकवॉटर मावेजा प्रश्न तातडीने मार्गी लागावा यासाठी हजारो शेतकऱ्यांसह धर्माबाद ते नांदेड असा भव्य मोटारसायकल मोर्चा काढण्यात आला.




छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिनानिमित्त

# शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने बीड जिल्हा प्रमुख उल्हास भैया गिराम यांच्या हस्ते व बीड जिल्हा संघटक नितीन भैय्या धांडे यांच्या वतीने मोफत बियाणे वाटप

बीड । प्रतिनिधी

बीड दि.६ जून रोजी सकाळी दहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिनानिमित्त जुना मोंढा परिसरात येथे शिवप्रेमीच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने व हिंदुरुदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या ब्रीदवाक्य प्रमाणे शिवसेनेचे वतीने अभिनव उपक्रमाचे आयोजन शिवसेनेचे उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी शेतकऱ्यांना मोफत बी बियाणे वाटप शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या हस्ते व शिवसेनेचे ज्येष्ठ नेते सुरेश तात्या शेटे, बीड जिल्हा समन्वयक संजयभाई महाद्वार, बुलंद छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल बहिर,समाजसेवक लक्ष्मण नरनाळे,मधुकर धांडे, शिवाजी तिपाले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व शिवसेना जिल्हा संघटक नितीनभैया धांडे यांच्या पुढाकाराने प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी केले होते.

छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिना निमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून यावेळी मोठ्या प्रमाणात शेतकरी बांधव व शिवप्रेमी उपस्थित होते.

# जिवाचीवाडीतील ऊसतोड मजूर कुटुंबातील सख्ख्या चार बहिणीची पोलीस भरतीमध्ये यशाची गवसणी

## चार सख्ख्या बहिणींसह आई वडिलांचा ग्रामस्थांकडून गौरव; यशाबद्दल सर्वत्र कौतुक

मस्साजोग । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील डोंगरी भागात असलेल्या जिवाचीवाडी येथील एका गरीब ऊसतोड मजूराच्या कुटुंबातील चार सख्या बहिणींनी पोलीस भरती मध्ये पहिल्याच प्रयत्नात यश संपादन करून आपल्या बापाची मान उंचावली आहे. उषा हनुमंत चौरे , अर्चना हनुमंत चौरे , शीतल हनुमंत चौरे आणि गीतांजली हनुमंत चौरे या चार सख्ख्या बहिणींनी मेहनत ,संघर्ष, जिद्द आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर नुकत्याच काही दिवसांपूर्वी झालेल्या पोलीस भरतीत महाराष्ट्र पोलीस दलात एकाच वेळी स्थान मिळवले आहे. अत्यंत प्रतिकूल आणि घरात अठरा विश्व दारिद्र आणि हलाखीची आर्थिक परिस्थिती असतानाही, या चारही बहिणीनी अहोरात्र अभ्यासात सातत्य ठेवत मेहनत आणि त्यांच्या आई–वडिलांच्या अखंड कष्टाची जाण ठेवून हे अभूतपूर्व यश मिळवले असून, जिल्हाभरातून त्यांच्या मिळवलेल्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक



होत आहे. ग्रामीण भागातील मुलींसाठी हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी ठरणार आहे.

हनुमंत चौरे आणि त्यांची पत्नी हे दोघेही वर्षानुवर्षे ऊसतोड मजूर म्हणून कष्ट करत आहेत. परिस्थिती कितीही कठीण असली तरी मुली शिकल्या पाहिजेत आणि स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या पाहिजेत, या एकाच ध्येयाने त्यांनी मुलींच्या शिक्षणात कोणतीही तडजोड केली नाही. मुलींनीही गावातूनच प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर, ग्रामीण भागातील मर्यादित सुविधा आणि आर्थिक संकटांचा सामना करत पोलीस भरतीचे स्वप्न मनात जिवंत ठेवले. एका अकॅडमीमध्ये प्रवेश घेऊन त्यांनी नियमित अभ्यास, कठोर शारीरिक सराव आणि स्वतःवरील विश्वासाच्या बळावर हे यश संपादन केले आहे. त्याबद्दल जीवाचीवाडी ग्रामस्थांकडून आई–वडील आणि पोलीस दलात भरती झालेल्या या चार सख्ख्या बहिणींचा शालश्रीफळ देऊन गौरव केला आहे.

मुलीच्या यशाबद्दल काय म्हणाले आई–वडील

आयुष्यभर कष्ट केले, पण मुलींना शिकवण्याचा निर्धार सोडला नाही. आज आमच्या चारही मुली पोलीस दलात भरती झाल्या, यापेक्षा मोठा आनंद दुसरा कोणताही नाही, अशी अत्यंत भावनिक प्रतिक्रिया त्यांच्या आई–वडिलांनी दिली आहे. एकाच कुटुंबातील चार मुलींनी एकाच वेळी पोलीस दलात भरती होऊन आपल्या आई–वडिलांसह या यशामुळे जिवाचीवाडी गावाचे नाव उंचावले आहे.

चारही बहिणीकडून मौलाचा संदेश

ग्रामीण भागातील मुलींसाठी कोणत्याही यश संपादन करण्यासाठी परिस्थिती नव्हे, तर जिद्द महत्त्वाची असते. ग्रामीण भागातील मुलींनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने मेहनत घ्यावी, असा मोलाचा संदेश या चारही बहिणींनी आपल्या यशाच्या माध्यमातून दिला आहे.




# जागतीक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना स्थळी वृक्षारोपण

माजलगाव । प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून दिनांक ५ जून २०२६ शुक्रवार रोजी कारखान्याचे ज्येष्ठ संचालक तथा साखर संघ मुंबईचे उपाध्यक्ष माननीय आमदार श्री. प्रकाश दादा सोळंके साहेब, माननीय चेअरमन साहेब श्री वीरेंद्र दादा सोळंके, माननीय व्हाईस चेअरमन साहेब श्री जयसिंग भैया सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सूचनेनुसार कारखाना स्थळी विविध वृक्ष लागवडीचा कार्यक्रम घेण्यात आला. जागतिक पर्यावरण दिन व केंद्र शासनाच्या एक पेड मा के नाम, या मोहिमेअंतर्गत कारखान्याचे संचालक माननीय श्री आबासाहेब गायकवाड, कार्यकारी संचालक श्री.

आर.सी. बडगुजर साहेब यांच्या हस्ते पन्नास वृक्षांचे रोपण करण्यात आले . माहे ऑक्टोबर २०२६ मध्ये ५०० वृक्ष लावण्याचा कारखान्याचा संकल्प असून, कारखान्याचे वतीने आतापर्यंत १२२०९ विविध प्रकारची झाडे लावण्यात आलेली असून ती चांगल्या पद्धतीने जोपासले आहेत. कारखाना प्रतिवर्ष वृक्षारोपण करून सामाजिक बांधिलकी व पर्यावरण संतुलन राखण्यासाठी कारखाना व्यवस्थापन प्रयत्नशील आहे. यावेळी जनरल मॅनेजर (इंजि)श्री एस एस शिंनगारे,सचिव सुरेश लगड श्री. बी.एस. झोडगे, चिफ अकाउंटंट श्री.एस.बी.घाडगे, डीस्टलरी मॅनेजर श्री.एम.जे.निर्मळ, ऊस पुरवठा अधिकारी श्री.बी.एस. वगरे,ऊस विकास अधिकारी श्री. ए. टी. स्वामी यांच्यासह कर्मचारी कामगार उपस्थित होते. या कार्यक्रमाचे औचित्य साधून ऊपस्थित खाते प्रमुख आणि विभाग प्रमुख यांच्या हस्ते विविध जातींच्या वृक्षांची लागवड कारखाना कार्यस्थळावर करण्यात आलेली आहे.



बीड – ६ जून शनिवार रोजी सकाळी कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५२ वा. राज्याभिषेक सोहळा दिनी महामानव अभिवादन ग्रुप बीड महाराजांना विनम्र अभिवादन करताना.

# देगलूरमध्ये शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

वार्ताहर / देगलूर

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासिक राज्याभिषेकाला ३५२ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने देगलूर शहरात शनिवारी (६ जून) जय भवानी.. जय शिवाजी ...च्या घोषणेमध्ये शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला.

इ.स. १६७४ मध्ये रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य आणि ऐतिहासिक राज्याभिषेक सोहळा पार पडला होता. त्या सुवर्णक्षणाच्या स्मरणार्थ दरवर्षीप्रमाणे यंदाही सकाळी नऊ वाजता शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवरायांच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी शिवस्मारक अध्यक्ष तथा नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष ड. अंकुश देसाई देगावकर, शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष तथा शिंदे सेनेचे युवा जिल्हाध्यक्ष नामदेव थडके पाटील , शिवसेना जिल्हा उपाध्यक्ष व्यंकटरावजी पाटील खतगावकर, अशोक पाटील राजुरकर, बालाजी पाटील थडके यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. डॉ. सुनील जाधव यांनी



जिजाऊ वंदना सादर करून उपस्थितांना शिवचरित्राच्या प्रेरणादायी विचारांची आठवण करून दिली.

या कार्यक्रमास राजू पाटील मलकापुरकर, खालिद पटेल, माधव पाटील लिंगनकेरुरकर, भागवत पाटील सोमुरकर, विठ्ठलराव भोसले, कैलास येसगे, जिजाऊ ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष सौ. चैतन्य वानखेडे, सचिव रंजना मानुरे, कार्याध्यक्ष दिपाली पाटील, संगीता कदम, उमाकांत भुताळे, विकास मोरे, सुनील थडके, शिवाजीराव वरखिंडे गवंडगावकर यांच्यासह अनेक शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे, देवेंद्र मोतेवार, बांधकाम सभापती सुमंत कांबळे, नगरसेवक बसवराज द्याडे, सय्यद भाई, चंद्रकांत मोरे आणि सुनील नागशेट्टीवार यांनीही शिवरायांना अभिवादन केले.

जय भवानी... जय शिवाजी... च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. शिवभक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. सूत्रसंचालन डॉ. सुनील जाधव यांनी केले तर आभार नामदेव पाटील देगावकर यांनी मानले.

# किनवट एस.टी आगार परिसरात अवैध प्रवासी वाहतुकी विरुद्ध विशेष धडक मोहीम

किनवट /प्रतिनिधी दि.०६ : नांदेड विभाग राज्य परिवहन महामंडळाच्या महसूलावर परिणाम करणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालण्यासाठी नांदेड विभागाने विशेष धडक मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत विभागातील प्रमुख बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात नो पार्किंग झोनची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत असून, विनापरवाना प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर विशेष कारवाई केली जात आहे. एसटी बसस्थानक परिसरात खासगी वाहनांद्वारे अनधिकृतपणे प्रवासी वाहतूक केली जात असल्याने महामंडळाच्या उत्पन्नात मोठी घट होत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच अशा वाहनांमुळे वाहतूक कोंडी, प्रवाशांची गैरसोय आणि अपघाताचा धोका वाढत असल्याने विभागीय प्रशासनाने ही मोहीम अधिक तीव्र केली आहे. राज्याचे परिवहन मंत्री यांच्या सूचनेनुसार तसेच राज्याचे मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत नांदेड विभागातील किनवट, माहूर, हिमायतनगर, हदगाव, उमरी, धर्माबाद, लोहा, मुदखेड, नायगाव, अर्धापूर, मुखेड, देगलूर, भोकर, बिलोली आणि कंधार आगारांच्या बसस्थानक परिसरात विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे. नियमांचे उल्लंघन करून बसस्थानक परिसरातून प्रवासी



उचलणाऱ्या वाहनांवर स्थानिक पोलिसांच्या सहकार्याने कठोर कारवाई केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, मोहिमेच्या पहिल्याच दिवशी किनवट बसस्थानक परिसरात पोलिस प्रशासनाच्या मदतीने २०० मीटर नो पार्किंग झोनमध्ये विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. यावेळी आगार प्रमुख अशोक चव्हाण, सहाय्यक वाहतूक अधिकारी शी. ल. ढगे, पोलिस कर्मचारी मुंडे व कुडमेते तसेच आगारातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत कारवाई करण्यात आली. एसटी प्रशासन, सुरक्षा विभाग आणि स्थानिक पोलिस यांच्यातील समन्वयातून ही मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे एसटी महामंडळाच्या महसूलात वाढ होण्यास मदत होणार असून प्रवाशांना सुरक्षित, नियमित आणि अधिकृत वाहतूक सेवा उपलब्ध होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. अवैध प्रवासी वाहतुकीवर नियंत्रण आणणे, एसटीचे उत्पन्न वाढविणे आणि प्रवाशांना सुरक्षित सेवा उपलब्ध करून देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे सुरक्षा विभागाकडून सांगण्यात आले.

# जयहिंद डिफेन्स करिअर अकॅडमीच्या विद्यार्थ्यांची सैन्य व पोलीस सेवेत घवघवीत कामगिरी

जिंतूर । प्रतिनिधी

:ग्रामीण भागातील युवकांना संरक्षण दल व पोलीस सेवेत करिअर घडविण्यासाठी मार्गदर्शन करणाऱ्या जयहिंद डिफेन्स करिअर अकॅडमी, जिंतूरच्या विद्यार्थ्यांनी विविध सेवांमध्ये निवड मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशामुळे अकॅडमीसह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

भारतीय सैन्यात अजय राठोड (पारडी), गोविंद पांचाळ (देवगाव), बालाजी बोरकर (पिंपळा), रोहन वानरे (वालूर), शिवाजी शिंदे (गोंडाळा), भारत डोईफोडे (बामणी), रवी कांबळे (दामपुरी), करण निरस (पडेगाव) तसेच गणेश पोंडार (गोंडाळा) यांनी यश मिळवत देशसेवेची संधी प्राप्त केली आहे. तसेच माऊली रोकडे (वालूर) यांची महाराष्ट्र सुरक्षा बल (एमएसएफ) मध्ये निवड झाली आहे.

अकॅडमीचे माजी विद्यार्थी गजानन रोकडे यांनी पोलीस विभागात १२ वर्षे सेवा बजावल्यानंतर विभागीय पदोन्नतीद्वारे पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पद मिळविले आहे. तसेच सय्यद जिन्नत हे पोलीस विभागात



कार्यरत असून योगिता गोरे या नागपूर शहर पोलीस दलात सेवा बजावत आहेत.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल कल्याण देशमुख, राहुल देशमुख आणि गिरीश वट्टमवार, अशोक शिंदे,पत्रकार महेश देशमुख यांनी त्यांचा हार घालून सत्कार केला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत ग्रामीण भागातील युवकांनी संरक्षण दल व पोलीस सेवेकडे करिअर म्हणून पाहावे, असे आवाहन करण्यात आले.

जयहिंद डिफेन्स करिअर अकॅडमीचे संचालक पांडुरंग उबाळे पाटील (माजी सैनिक) यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे परिसरातील अनेक युवकांना सैन्य व पोलीस सेवेत प्रवेश करण्याची प्रेरणा मिळत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात एसटीची धडक मोहीम; बसस्थानक परिसरात २०० मीटरपर्यंत 'नो पार्किंग झोन'

जिंतूर । प्रतिनिधी

राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) उत्पन्नाला फटका देणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीवर आळा घालण्यासाठी राज्यभर विशेष मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या मोहिमेअंतर्गत सर्व प्रमुख बसस्थानकांच्या परिसरात अनधिकृतपणे प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कडक कारवाई केली जाणार असून, बसस्थानकापासून २०० मीटरपर्यंतचा परिसर 'नो पार्किंग झोन' म्हणून घोषित करण्यात आला आहे. ही मोहीम ५ जून ते १५ जून या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक तसेच एसटी महामंडळाच्या मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी तथा पोलीस उप महानिरीक्षक डॉ. नारनवरे, यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात येत आहे. गेल्या काही वर्षांत खासगी वाहनांद्वारे होत असलेल्या अवैध प्रवासी वाहतुकीमुळे एसटी महामंडळाच्या महसुलात मोठी घट झाली आहे. तसेच अशा वाहनांमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होत असल्याने प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली आहे.

या मोहिमेदरम्यान बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात थांबून प्रवासी उचलणाऱ्या किंवा अनधिकृतपणे प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर विशेष लक्ष ठेवले जाणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर स्थानिक पोलिसांच्या मदतीने दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी राज्यातील सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक आणि स्थानिक प्रशासनाला सहकार्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.परभणी विभागातील जिंतूर, परभणी, सेलू, पाथरी, मानवत, वसमत, हिंगोली, कळमनुरी आदी प्रमुख बसस्थानकांच्या परिसरातही ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. बसस्थानकाबाहेर प्रवासी गोळा करून वाहतूक करणाऱ्या वाहनांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार असून, अशा वाहनांवर तत्काळ कारवाई केली जाणार आहे.परभणी विभागाचे सुरक्षा व दक्षता अधिकारी काळबांडे यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात येणार आहे. विभागातील अधिकारी, पर्यवेक्षक, आगार प्रशासन आणि स्थानिक पोलीस यांचे संयुक्त पथक कारवाई करणार असून, अवैध प्रवासी वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

एसटी प्रशासनाने प्रवाशांनाही आवाहन केले असून, अधिकृत एसटी सेवेलाच प्राधान्य द्यावे आणि सुरक्षित प्रवासासाठी अनधिकृत वाहनांचा वापर टाळावा, असे सांगितले आहे. या विशेष मोहिमेमुळे बसस्थानक परिसरातील अवैध प्रवासी वाहतुकीला मोठ्या प्रमाणात आळा बसेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




एसटीचे उत्पन्न वाढविणे, प्रवाशांना सुरक्षित आणि विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देणे तसेच अनधिकृत प्रवासी वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण आणणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. स्थानिक पोलीस व आगार प्रशासनाच्या सहकार्याने नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल– अ.ल.काळबांडे सुरक्षा व दक्षता अधिकारी

# पाणीटंचाईने नागरिक हैराण; नगरसेवकांच्या दुर्लक्षामुळे संताप वाढला

उल्हासनगर परिसरातील अनेक भागांमध्ये गेल्या काही दिवसांपासून पाणीपुरवठ्याची गंभीर समस्या निर्माण झाली असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांची दैनंदिन कामे विस्कळीत झाली आहेत. स्थानिक रहिवाशांनी अनेक वेळा तक्रारी करूनही संबंधित प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप केला आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, पाणीपुरवठ्याच्या समस्येबाबत वारंवार लक्ष वेधूनही नगरसेवकांकडून दुर्लक्ष केले जात आहे. पाणी मिळवण्यासाठी महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे.

अलीकडे उल्हासनगर परिसरात पाईपलाईन नुकसान व पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत.स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे तात्काळ लक्ष देण्याची मागणी केली असून, दोषी अधिकाऱ्यांवर आणि संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. येत्या काही दिवसांत समस्या न सुटल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.निवडणुकीत आश्वासने देणारे लोकप्रतिनिधी आता नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करत आहेत. पाणी हा आमचा हक्क असून तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी भावना संतप्त नागरिकांनी व्यक्त केली.